७० वर्ष
निर्भीड पत्रकारितेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# सर्वस्व हरपले, पण मी खचणार नाही

**बारामती (दै. संध्या)**



बारामती विधानसभा पोट निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या महायुतीकडून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या आहेत. बारामतीच्या ऐतिहासिक शारदा प्रांगणात विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची सांगता सभा पार पडली. यावेळी आपल्या पतीच्या आठवणींनी सुनेत्रा पवार यांना अनेकदा गहिवरून आले. मी माझे सर्वस्व हरपले, पण मी थांबणार नाही, खचणार नाही, मागे हटणार नाही, असे त्यांनी म्हटले. तसेच येसुबाई जशा लढल्या, अहिल्याबाई होळकरांनी जसा कारभार चालवला आणि आपल्या लोकांना न्याय दिला, त्याच निष्ठेने मी तुमची सेवा करेल, असे आश्वासन बारामतीच्या जनतेला दिले.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, या निवडणुकीमध्ये सर्वच पक्षांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल सुरुवातीलाच मी मनापासून आभार मानते. पवार साहेब व सुप्रिया सुळेंचे विशेष आभार मानते. मला उत्स्फुर्तपणे जाहीर पाठिंबा देणाऱ्या संस्था आणि संघटनांचे ऋण व्यक्त करते. हा पाठिंबा म्हणजे बारामतीच्या भवितव्याबद्दलची एकत्रित बांधिलकी आहे, असे मी मानते. पवार कुटुंबाच्या सामाजिक आणि राजकीय वारशाची पायाभरणी करणाऱ्या अजित पवारांच्या आजी शारदाबाई पवार यांचे आवर्जून आभार मानते. त्यांनी एक सून म्हणून केवळ पवारांचे कुटुंब सांभाळले नाही, तर त्यांनी संस्कार, नितीमुल्य आणि संघर्षाची भक्कम परंपरा निर्माण केली. यामधून पुढे विविध क्षेत्रांमध्ये मोठे नेतृत्व घडत गेले. त्यांनी कुटुंबापुरतेच मर्यादित न राहता, समाज आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीतही मोलाचा वाटा उचलला. पवार साहेबांच्या दूरदृष्टीमधून आपण बारामतीच्या विकासाचा पाया रचला. खऱ्या अर्थाने अजितदादांनी अपार कष्टाने त्यावर कळस चढवला. पवार साहेबांचे आशीर्वाद आपल्यासाठी मोलाचे आहेत. आमच्या आई आशाताई अनंतराव पवार यांचा आशीर्वाद हा आमच्यासाठी सर्वात मोठा आधार आहे. खरं सांगायचं तर, बारामतीच्या ऐतिहासिक शारदा प्रांगणात आज आपल्या विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची सांगता सभा होत आहे. आपल्याला माहीत आहे की, या मैदानाला संघर्षाची, एकजुटीची मोठी परंपरा आहे. या प्रांगणात अजितदादांचा अनेकवेळा नागरी सत्कार करण्यात आलेला आहे. आज या सांगता सभेला उसळलेला जनसागर म्हणजे अजितदादांविषयी असलेला आपला सन्मान, आदर आणि प्रेम म्हणायला हरकत नाही. या मंचावर उभे राहताना माझ्या अंतकरणात भावनांचा कल्लोळ माजला आहे. अजितदादांशिवाय आपल्याला ही सभा घ्यावी लागत आहे, हे मानायला मन तयारच नाही.

गेली ३५ वर्षे पवार साहेबांच्या पावलांवर पाऊल टाकत अपार कष्ट करून दादांनी ही बारामती उभी केली. त्यांच्याशिवाय ही सभा घ्यावी लागेल, असे कधी स्वप्नातही वाटले नाही. आज बारामतीतील अबालवृद्ध दादांच्या आठवणीत अजुनही शोकाकुल आहे.

## १९६७ नंतर पहिल्यांदाच शरद पवार मतदानापासून वंचित

**बारामती (दै. संध्या)**

बारामती विधानसभेच्या पोट निवडणुकीच्या निमित्ताने एक ऐतिहासिक आणि भावूक घडामोड समोर आली आहे. १९६७ मध्ये लढवलेल्या पहिल्या निवडणुकीपासून आतापर्यंत कधीही आपला मतदानाचा हक्क न चुकवणाऱ्या शरद पवार यांना यंदा प्रकृती अस्वास्थ्यामुळे मतदानापासून दूर राहावे लागणार आहे. ही माहिती स्वतः शरद पवार यांनी सोशल मीडियाद्वारे दिली असून, त्यांनी बारामतीकरांना सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन केले आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती विधानसभेची जागा रिक्त झाली होती. या जागेवर पोटनिवडणूक होत असून, सुनेत्रा पवार महायुतीकडून निवडणूक लढवत आहेत. बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे बारामतीत आज सुनेत्रा पवारांसाठी भव्य सांगता सभा पार पडली. या सभेला महायुतीतील तिन्ही पक्षांतील प्रमुख नेत्यांसह शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही हजेरी लावली होती. शरद पवार मात्र प्रकृती ठीक नसल्याने ते प्रचार सभेला येऊ शकले नाही. त्यातच आता आपण पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार नसल्याचे त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून सांगितले.

**शरद पवार यांची सोशल मीडिया पोस्ट जशास तशी**

शरद पवार म्हणाले, मी १९६७ मध्ये लढविलेल्या पहिल्या निवडणुकीपासून बारामती मतदारसंघातील माझ्या मतदानाचा हक्क अखंडपणे बजावला. आता २०२६ मध्ये बारामती विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राचे एक लाडके व लोकप्रिय नेते स्व. अजित पवार यांच्या दुर्दैवी, अपघाती निधनाच्या शोकात्म पार्श्वभूमीवर ही पोटनिवडणुक होत आहे.

या पोटनिवडणुकीसाठी बारामती येथे येऊन आतापर्यंतच्या प्रघातानुसार मतदान करण्याचे मी ठरवले होते. दुर्दैवाने माझी प्रकृती बिघडल्याने मला मुंबईत रुग्णालयात दाखल व्हावे लागले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




## देश तुम्हाला बेकारांचा कारखाना करायचा का? : उद्धव ठाकरे

**मुंबई (दै. संध्या)**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी महिला आरक्षण व मतदारसंघ पुनर्रचनेच्या मुद्यावरून भाजपवर कडाडून हल्ला चढवला. देशात काही राज्य कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. डिलिमिटेशन अर्थात मतदारसंघ पुनर्रचनेमुळे या राज्यांचे संसदेतील प्रतिनिधित्व कमी झाले असते. सरसंघचालक मुले जन्माला घालण्याचा सल्ला देत आहेत. पण त्यांना पोसणार कोण? आज सगळे देशोधडीला लागलेत. देश तुम्हाला नुसता बेकारांचा कारखाना करायचाय का, असे उद्धव ठाकरे म्हणालेत.

उद्धव ठाकरे आज मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले, आत्मविश्वास असेल तर जगाच्या पाठीवर कुठेही गेलात, तरी तुम्हाला मरण नाही. हा आत्मविश्वास आपण गमावत चाललो काय? ठीक आहे, दिवस येतात, दिवस जातात, लोक येतात, लोकं जातात. त्यांची कर्मेही त्यांच्यासोबतच जातात. कुणी कितीही मोठा असला तरी ते चुकत नाही. जेव्हा आपण पारतंत्र्यात होतो तेव्हा लोकमान्य टिळक उद्वेगाने म्हणाले होते, काय हे लोक आहेत, त्यांना ना गुलामीची चिड आहे ना स्वातंत्र्याची चाड आहे, कशासाठी काम करायचे? आम्ही जिव तोडून नेतृत्व करत आहोत. तुमच्यासाठी लढत आहोत, पण तुम्ही सोबत येणार आहात का.

आज सर्वत्र एक प्रकारची वखवख सुरू आहे. सर्वकाही मलाच पाहिजे अशी वृत्ती सुरू आहे. कुणाला काही वाटत असेल की, तिकडे जाऊन खूप काही मिळेल. पण पहिल्यांदा तिकडे गेलेल्यांचे अनुभव ऐका. आम्ही मागील 58 वर्षांत एकही दिवस कामगारांचा विश्वासघात केला नाही. आम्ही असे कधीच होऊ देणार नाही. कारण, माझे नाते गेटवर लागलेल्या भगव्याशी आहे, कंपनीच्या मालकांशी नाही. त्याला जो कुणी हात लावेल, त्याचे तुकडे कसे करायचे ही जबाबदारी तुमची आहे.

## मोर्चामुळे वाहतूक कोंडी : संतप्त महिलेने महाजनांनाच झापले

**मुंबई (दै. संध्या)**



महिला आरक्षण विधेयक संमत न झाल्याच्या निषेधार्थ आज वरळीत महायुतीकडून जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. मात्र, या मोर्चात एक वेगळाच पेच पाहायला मिळाला. मोर्चामुळे झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीत तासाभरापासून अडकलेल्या एका सामान्य महिलेचा संयम सुटला आणि तिने थेट मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर आपला संताप व्यक्त केला. "लोकांना वेठीस धरून रस्त्यावर आंदोलन करण्यापेक्षा बाजूच्या मैदानात जा," अशा शब्दांत या महिलेने सत्ताधाऱ्यांना धारेवर धरल्याने मोर्चाच्या ठिकाणी काही काळ तणाव निर्माण झाला होता.

महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर न झाल्याने महायुतीच्या महिला आघाडीने काँग्रेससह इतर विरोधी पक्षांविरोधात आज (२१ एप्रिल) वरळीत मोर्चाचे आयोजन केले होते. मात्र, या मोर्चामुळे दुपारच्या सुमारास वरळी आणि आसपासच्या परिसरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली. दुपारी १ च्या सुमारास वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिक हैराण झाले होते.

याच कोंडीत अडकलेल्या एका महिलेचा संताप अनावर झाला. ती आपल्या कारमधून खाली उतरली आणि थेट मोर्चाच्या ठिकाणी पोहोचली. तिथे उपस्थित महिलांना आणि पोलिसांना जाब विचारत तिने गोंधळ घातला. "एका तासापासून मी इथे अडकले आहे. लोकांच्या कामाला आणि मुलांच्या शाळेला अडथळा निर्माण करून हे कसले आंदोलन?" असा सवाल करत तिने आंदोलनकर्त्यांना सुनावले.

**मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर संताप**

या मोर्चामध्ये भाजपचे संकटमोचक समजले जाणारे मंत्री गिरीश महाजन आणि मुंबईच्या महापौर रितू तावडे सहभागी झाल्या होत्या. संबंधित महिलेने थेट त्यांच्यासमोर जाऊन वाहतूक कोंडीचा पाढा वाचला. "आम्हाला त्रास देऊ नका, आंदोलन करायचे असेल तर मैदानात करा." महिलेने सांगूनही कुणी ऐकत नसल्याचे पाहून 'तुम्हाला समजत नाहीये का?' असा सवाल गिरीश महाजन यांना केला. यावेळी तिने पोलिसांनाही रस्ता रिकामा करण्यासाठी धारेवर धरले. पोलिसांना परिस्थिती हाताळताना मोठी कसरत करावी लागली.

**रोहित पवारांची सरकारवर टीका**

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, "अनेक लोकांना आरोग्याच्या अडचणी असतात आणि अशा परिस्थितीत केवळ केंद्रातून आदेश आले म्हणून आणि His Masters Voice ला खूष करण्याच्या प्रयत्नात एखादा पक्ष लोकांना तीन-तीन तास ट्रॅफिकमध्ये अडकवून ठेवत असेल तर त्याची जोरदार रिॲक्शन मिळणारच..

अशाच एका संतप्त महिलेचा मुंबईतील व्हिडिओ बघायला मिळाला. आंदोलनाचं कारण सत्य असेल तर लोकं समजून घेतात... पण खोट्यासाठी लोकांना वेठीस धरलं जात असेल तर लोक तोंडावर कशी फजिती करतात, हेच या व्हिडिओतून दिसतं. आता त्रस्त व्यक्ती रागावल्याने काही वेळा शब्द चुकीचे जाऊ शकतात पण म्हणून संबंधित लाडक्या बहिणीवर कारवाई न करता तिच्या भावना समजून घेऊन तिला त्रास देणाऱ्यांनीच आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे...!." असेही रोहित पवार म्हणालेत.

**ब्रेकिंग न्यूज**

## मराठीच्या सक्तीवरून रिक्षाचालक आक्रमक

मुंबई (दै. संध्या) : राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावरून आता मोठा पेच निर्माण झाला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ मे पासून या नियमाची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले असतानाच, रिक्षाचालकांच्या सर्वात मोठ्या संघटनेने याविरोधात एल्गार पुकारला आहे. या नियमाच्या निषेधार्थ ४ मे पासून राज्यातील तब्बल १५ लाख रिक्षाचालक बेमुदत संपावर जाण्याची शक्यता आहे. परिवहन विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, आता परवाना (Permit) मिळवण्यासाठी आणि रिक्षा-टॅक्सी चालवण्यासाठी चालकाला मराठी भाषा येणे बंधनकारक आहे. १ मे (महाराष्ट्र दिन) पासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. नियम न पाळणाऱ्या आणि मराठी येत नसलेल्या चालकांविरुद्ध १ मे पासून राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवून दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. 'मुंबई ऑटोरिक्षा मेन्स युनियन'ने सरकारच्या या 'मराठी सक्ती'च्या धोरणाविरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

## उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्सचा शुभारंभ

# अतिउष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम उपाययोजना करणार : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**



हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः अल्प भूधारक शेतकऱ्यांना बसत आहे अतिउष्णतेच्या संकटावर उपाययोजना करण्यासाठी तसेच 'उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्स'चा शुभारंभ करण्यात आला असून हे केंद्र भविष्यात राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेचा भाग म्हणून कार्यरत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे आयआयएम, नागपूर येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेसिलियन्स अँड सस्टेनेबल कुलिंग'चे उदघाटन केले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना, एनआरडीसी इंडियाच्या कंट्री डायरेक्टर दीपा सिंग बगई, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉक्टर भालचंद्र चव्हाण, नागपूर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भिमराया मैत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,"विदर्भासह राज्याच्या अनेक भागांत अलीकडे उष्णतेच्या लाटेमुळे शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्याची वेळ आली होती. हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः छोट्या शेतकऱ्यांना बसत आहे. दुष्काळ, गारपीट आणि वाढते तापमान यामुळे समस्याही गंभीर होत आहेत, यावर तोडगा काढण्यासाठी सेंटर फॉर एक्सलन्स उपयुक्त ठरणार आहे. या संस्थेमार्फत सुरुवातीला प्राधान्याने उष्णलाट कृती आराखडा आणि शहरी हवामान कृती आराखड्यांचा आढावा घेऊन प्राधान्य दिलेल्या शहरांना आणि जिल्ह्यांना तांत्रिक अंमलबजावणीसाठी सहाय्य केले जाईल. उष्णलाट कृती आराखड्यासाठी सक्षम योजना तयार करणे, वार्षिक अंमलबजावणीवर भर देणे. त्यासाठी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, स्थानिक शहरी नागरिकांसाठी प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "शाश्वत विकासासाठी महाराष्ट्र ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत आहे. २०३० पर्यंत ५२ टक्के ऊर्जा नवीकरणीय स्रोतांमधून, २०३५ पर्यंत ६५ टक्के ऊर्जा अपारंपरिक स्रोतांतून घेण्याचे नियोजन आहे. शेतकऱ्यांना लागणारी १६ हजार मेगावॅट वीज सौर ऊर्जेद्वारे देण्याचा प्रयत्न सुरू आहे. वाढत्या उष्णतेमुळे सर्वत्रच एसी वापर वाढतो त्यामुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी यावर उपाय म्हणून राज्यात प्रभावी 'हीट ॲक्शन प्लॅन' राबवला जाईल. बांधकाम क्षेत्रात आणि दैनंदिन वापरात स्थानिक व पर्यावरणपूरक उपाययोजनांना प्राधान्य देऊन विकास साधण्यावर भर देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## CSMT स्थानकावर दोन लोकल आमनेसामने

**मुंबई (दै. संध्या)**



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे मंगळवारी दुपारी 3 वाजेच्या सुमारास दोन लोकल एकाच ट्रॅकवर आमनेसामने आल्याची अत्यंत गंभीर घटना घडली असून, याप्रकरणी मध्य रेल्वे प्रशासनाने तत्काळ पावले उचलत संबंधित स्टेशन मास्तरला निलंबित केले आहे. सुदैवाने या घटनेत मोठा अनर्थ टळला असला, तरी प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड आणि संभाव्य धोक्याचे गांभीर्य लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाकडून ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.

बदलापूरहून येणारी फास्ट लोकल नियोजित प्लॅटफॉर्म क्रमांक 4 ऐवजी अचानक 5 कडे वळवण्यात आली, जिथे आधीच एक लोकल उभी होती. मात्र समोर दुसरी गाडी असल्याचे लक्षात येताच मोटरमनने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आणि तातडीने लावलेल्या ब्रेक्समुळे दोन्ही गाड्यांमध्ये अवघ्या 120 मीटरचे अंतर राहिले आणि मोठी दुर्घटना टळली. रेल्वेच्या सिग्नल आणि ट्रॅक व्यवस्थापनातील संभाव्य त्रुटीमुळे घडलेल्या या गंभीर घटनेची तातडीने दखल घेत, प्रशासनाने जबाबदारी निश्चित करत संबंधित स्टेशन मास्तरला निलंबित केले आहे.

तज्ज्ञांच्या मते, दोन गाड्या एकाच ट्रॅकवर येण्याची घटना अत्यंत दुर्मिळ असून, सिग्नल प्रणाली किंवा ट्रॅक कंट्रोल यंत्रणेत मोठा बिघाड झाल्यासच अशी परिस्थिती उद्भवू शकते. याच कारणामुळे रेल्वे प्रशासनाकडून या प्रकरणातील तांत्रिक त्रुटींचा सखोल तपास केला जात आहे. सीएसएमटी येथील ही घटना रेल्वेच्या सुरक्षितता यंत्रणेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरली आहे.

दुसरीकडे, रेल्वेच्या कामकाजात बुधवारी झालेला हा सलग तिसरा बिघाड ठरल्याने प्रवाशांचा संयम सुटला आहे. पहाटे खर्डी येथील ब्लॉकची वाढलेली वेळ आणि त्यानंतर डोंबिवलीत पूर्वसूचनेशिवाय घेतलेला ब्लॉक यामुळे लोकलचे वेळापत्रक आधीच कोलमडले होते. त्यातच सीएसएमटी येथील या घटनेची भर पडल्याने सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली. या गोंधळामुळे स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी होऊन त्यांना मनस्ताप सहन करावा लागला असून, रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनावर प्रवाशांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## संपादकीय

# जगातलं एकमेव ‘सेव्हन स्टार’ हॉटेल ‘बंद’ होणार!

कुठल्याही फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये जायचं तर तिथे किती पैसे मोजावे लागतात, हे आपल्याला माहीत आहे. अर्थात तिथल्या सोयीसुविधाही तशाच दर्जेदार असतात आणि आपला नावलौकिक जपण्याचा प्रयत्नही या हॉटेल्सकडून सातत्यानं केला जातो. त्यामुळेच जगभरातील गर्भश्रीमंतांकडून अशा हॉटेल्सना कायम पसंती दिली जाते. जगातील एकमेव ‘सेव्हन स्टार’ हॉटेल दुबईमध्ये आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे जवळपास २५ वर्षांपासून संपूर्ण जगातील गर्भश्रीमंत आणि व्हीआयपी पाहुण्यांची पहिली पसंती ठरलेलं हे सेव्हन स्टार हॉटेल आता ‘बंद’ होत आहे! का? त्यालाही काही करणं आहेत. इराण आणि इस्रायल-अमेरिका युद्धादरम्यान इराणचं ड्रोन या हॉटेलवर आदळलं होतं. त्यामुळे या हॉटेलचं काही प्रमाणात नुकसान झालं होतं. त्यामुळे हे हॉटेल संपूर्ण जगभरात पुन्हा एकदा चर्चेत आलं. मात्र, हॉटेल बंद होण्याचं हे कारण नाही. त्यामागे दुसरंच कारण आहे, पण तत्पूर्वी फाइव्ह स्टार हॉटेल आणि सेव्हन स्टार हॉटेल म्हणजे काय, त्यात काय फरक असतो, हे समजून घेणं महत्त्वाचं आहे.

मुळात कोणत्याही हॉटेलसाठी अधिकृतरीत्या सर्वोच्च दर्जा ‘फाइव्ह स्टार’ एवढाच आहे. त्यांच्या उत्कृष्ट दर्जामुळे त्यांना ‘फाइव्ह स्टार’चा दर्जा दिला जातो. मात्र ‘सेव्हन स्टार’ हॉटेल.. असा काही प्रकार नसतोच. अधिकृतरीत्या जगात एकही ‘सेव्हन स्टार’ हॉटेल नाही; पण तरीही ज्या हॉटेल्सच्या प्रॉपर्टीज अल्ट्रा लक्झरी आहेत आणि फाइव्ह स्टार हॉटेल्समध्येही ज्यांचा दर्जा सर्वोत्तम मानला जातो, त्यातील काही हॉटेल्सना ‘सेव्हन स्टार’ हॉटेल म्हटलं जातं. त्यात हाताच्या बोटावर मोजता येतील अशा काही हॉटेल्सची गणना केली जाते. मात्र या सर्व हॉटेल्समध्ये खऱ्या अर्थानं ‘सेव्हन स्टार’ हॉटेलचा सन्मान संपूर्ण जगभरात केवळ एकाच हॉटेलला दिला जातो आणि ते म्हणजे दुबईतील ‘बुर्ज अल अरब’ हे आत्यंतिक आलिशान हॉटेल!

दुबईतीलच ‘मँडरिन ओरिएंटल’, त्याचप्रमाणे जगभरातील ‘सिग्नेल सेऊल’, ‘पंगू सेव्हन स्टार’, टाऊन हाऊस गॅलेरिया.. इत्यादी हॉटेलन्सनाही ‘सेव्हन स्टार’ मानलं जातं; पण ‘बुर्ज अल अरब’ची तोड कोणालाच नाही. ..हे हॉटेल आता ‘बंद’ होणार असलं तरी कायमस्वरुपी नाही. पुढचे दीड वर्ष म्हणजेच १८ महिन्यांसाठी हे हॉटेल त्याचा दर्जा कायम टिकवण्यासाठी आणि वाढविण्यासाठी, रिनोव्हेशनसाठी बंद ठेवलं जाणार आहे. फ्रान्समधील प्रसिद्ध इंटिरियर डिझायनर ट्रिस्टन



ऑयर यांच्याकडे त्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. १९९० च्या दशकात दुबईचे शासक शेख मोहम्मद बिन राशीद अल मकतुम यांनी अशा ऐतिहासिक इमारतीची कल्पना केली होती. पॅरिसमध्ये जसं आयफेल टॉवर किंवा ऑस्ट्रेलियामध्ये सिडनी ओपेरा हाऊस आहे, तशीच इमारत आपल्याकडे असावी अशी त्यांची इच्छा होती. त्यावेळी ब्रिटिश वास्तुकार टॉम राइट यांनी नॅपकिनवर पारंपरिक अरबी नौका (धो)चं चित्र काढलं, जे पुढे या हॉटेलच्या आकाराचं स्वरूप बनलं. या रचनेचा उद्देश दुबईच्या समुद्री वारशाचं प्रतिबिंब दाखवणं होता. बुर्ज अल अरब हॉटेल समुद्रकिनाऱ्यापासून २८० मीटर उंचीवर पुनर्निर्मित बेटावर वसवलेलं आहे. हॉटेलच्या आतली रचना भव्य राजवाड्यासारखी आहे, ज्यात संगमरवर आणि २४ कॅरेट सोन्याच्या परतीनं सजवलेले २०२ डुप्लेक्स सूट आहेत. हॉटेलमध्ये पाहुण्यांना सोन्याची परत चढवलेले आयपॅड दिले जातात!

## गुरु वचन

### ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रूप

प्रार्थना ईश्वराशी एकरुप होण्याची प्रभावी पद्धत आहे. लोक विविध प्रार्थना करतात. काही लोक संसारिक वस्तूंसाठी प्रार्थना करतात. उदाहरणार्थ चांगली नोकरी, नवे घरे किंवा नवी कार. काही लोक आरोग्यासाठी प्रार्थना करतात ज्यामुळे ते किंवा त्यांचे कुटूंब सुदृढ व्हावे. काही लोक वैयक्तिक संबंध वृद्धींगत होण्यासाठी प्रार्थना करतात. पण बहुतांश लोक संसारिक वस्तुंसाठीच प्रार्थना करतात. सामान्यपणे जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा आपण ईश्वराकडे स्वत:साठी काहीतरी मागतो. आपण नेहमी त्या वस्तूंसाठी प्रार्थना करतो, ज्या आपल्यासाठी फायदेशीर ठरतील. त्यावेळी आपली जीवनाबाबत माहिती मर्यादित असते. अनेकदा आपण अशा गोष्टींसाठी प्रार्थना करु शकतो ज्या आपल्यासाठी फायदेशीर आहेत पण अखेरीस त्या गोष्टी आपल्यासाठी फायदेशीर ठरत नाही. आपण प्रार्थना करुन एखादी वस्तू मिळवू शकतो पण मोठ्या काळानंतर ती आपल्या लायक नसल्याचे दिसते.

म्हणून मी समजतो की, प्रार्थनाची योग्य पद्धत ईश्वराची इच्छा आपल्या जीवनात उतरवणे. म्हणून अनेक धर्मात म्हण आहे की, माझी इच्छा नव्हे तुमची इच्छा पूर्ण होवो. का? कारण ईश्वराला आपल्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची माहिती असते. तो जाणतो की, खरंच आपल्यासाठी काय सर्वोत्तम आहे. उदाहरणार्थ आपण विचार करूतो की, १ कोटीची लॉटरी लागली तर खुप बरे होईल.

पण आपण हे लक्षात घेत नाही की, एवढे पैसे मिळाल्यानंतर दोन गोष्टी होऊ शकतात. आपण मोठ-मोठ्या वस्तूंच्या खरेदीत इतके गुरफटतो की आपण ईश्वराला विसरतो किंवा आपल्या सर्व मित्रांना पैशात वाटा हवा असतो. आपण पैसे न देण्यामुळे मैत्री तुटू शकते व आपण एकटे पडू शकतो म्हणून आपल्यासाठी काय चांगले आहे? हे आपण खरंच समजून घेत नाही. आपल्या मर्यादित दृष्टीकोनामुळे आपण ते मागतो जे आपल्या विचारानुसार चांगले आहे पण जर आपण हे ईश्वरावर सोडले की आपल्यासाठी जे सर्वोत्तम असेल ते त्याने द्यावा तेव्हा आपण खरी प्रार्थना करतो.

प्रार्थनेचे सर्वोच्च रूप म्हणजे ईश्वराला जाणणे व ईश्वरात एकरुप होणे. ईश्वरास जाणण्याची प्रार्थना म्हणजे त्या शक्तीचे आवाहन करणे जिने आपली निर्मिती केली. जेव्हा ईश्वरास जाणण्याची इच्छा आपल्या मनात निर्माण होते तेव्हा ती एक अविरत प्रार्थना बनते, जी तोवर थांबत नाही जोवर आपण ईश्वरास प्राप्त करून घेत नाही.

ईश्वर जाणण्याच्या अशाच प्रार्थनेला ध्यान (मेडिटेशन) किंवा योगा म्हटले जाते. ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रुप आहे. प्रार्थनेत आपण ईश्वराला सांगतो की, आपणास काय हवे आहे. ध्यानात आपण ईश्वरास ऐकतो की, त्यास काय हवे आहे.

ध्यान म्हणजे शांत बसणे नाही. या दरम्यान आपले संपूर्ण लक्ष ईश्वरास शोधत असते. आपण जीवनातील सर्व लक्ष्य विसरुन ईश्वराची दया आपल्या कशी प्रवेश करेल? या तयारीने बसतो. ध्यान यांत्रिक काम नाही. तथापि, काही प्रार्थना यांत्रिक असतात. या ईश्वरात लीन होण्यासाठी आपले मन, व आत्म्यात उठणारी तीव्र इच्छा आणि व्याकुळ अवस्था आहे.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १२६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 6 | | 1 | 9 | | |
| 5 | | | | | 8 | | 7 | 2 |
| | | | 5 | | 4 | | 6 | |
| 6 | 1 | 7 | | | | | | |
| 9 | 2 | | 4 | | 6 | | 5 | 7 |
| | | | | | | 6 | 2 | 9 |
| | 7 | | 1 | | 5 | | | |
| 1 | 8 | | 2 | | | | | 4 |
| | | 5 | 8 | | 9 | | | 6 |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १२५ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 2 | 3 | 4 | 7 | 9 | 8 | 6 |
| 6 | 7 | 9 | 5 | 1 | 8 | 3 | 2 | 4 |
| 3 | 8 | 4 | 2 | 6 | 9 | 7 | 1 | 5 |
| 1 | 6 | 3 | 9 | 8 | 5 | 4 | 7 | 2 |
| 7 | 4 | 5 | 6 | 2 | 3 | 1 | 9 | 8 |
| 9 | 2 | 8 | 1 | 7 | 4 | 5 | 6 | 3 |
| 8 | 9 | 7 | 4 | 5 | 2 | 6 | 3 | 1 |
| 2 | 5 | 1 | 7 | 3 | 6 | 8 | 4 | 9 |
| 4 | 3 | 6 | 8 | 9 | 1 | 2 | 5 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८९३ – पॉल क्रगर तिसऱ्यांदा ट्रन्सवालच्या राष्ट्राध्यक्षपदी निवडूण आले.
- १९४४ – हिटलर आणि मसुलिनीने सल्सबर्ग येथे भेट घेतली.
- १९८१– चिलीत दहा हजार तांब्याचे काम करणारे कामगार संपावर गेले.

### राष्ट्रीय

- २००६ – भाजपाचे सरचिटणीस प्रमोद महाजन यांच्यावर त्यांच्या धाकट्या बंधू प्रवीण महाजनने गोळ्या झाडल्या.
- २००६ – अरुणचल प्रदेशात चक्रीवादळात सहा जण ठार झाले.
- २००७ – औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नव्यानेच बांधलेल्या नाट्यगृहाला लागलेल्या आगीत कोट्यवधी रुपयांची हानी झाली.


### जन्म

- १३५७ – जोहन पहिला, पोर्तुगालचा राजा.
- १४५१ – इसाबेला पहिली, स्पेनची राणी.
- १९४५ – ॲलन डुक्स, इरिश राष्ट्राध्यक्ष.
- १९५८ – अश्रफ अली, पाकिस्तानी क्रिकेट यष्टीरक्षक.
- १९५९ – रंजन मदुगले, श्रीलंका कसोटी संघाचा मार्गदर्शक.

### निधन

- १९४६ – राज्य घटनातज्ज्ञ श्रीनिवासशास्त्री व्ही. एस. यांचे निधन.
- १९७९ – जानकीदेवी बजाज यांचे निधन.
- २००७ – भारतीय फुटबॉल संघाचे अध्यक्ष आदित्य कश्यप यांचे निधन.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १२६



**आडवे शब्द**

१. श्रीकृष्ण
३. श्रीकृष्णाचे वाद्य
५. श्रीकृष्णाचे शस्त्र
९. वर्षाव, भडिमार
११. भुरभुरता बर्फ
१३. भिस्त, अवलंबून राहणे
१४. पती, मालक
१६. तळे
१७. डोळ्याचे एक प्रसाधन
१८. ताटातूट
२०. डाळीचा पातळ पदार्थ
२१. वायू
२२. सापडणारा उपाय
२४. दरोडेखोर
२६. राजाचे घर
२८. लहान मूल
३०. पहिले पाऊल
३३. अडथळा
३५. तणाव
३६. किंतू, संशय
३७. दुधाचा एक दुर्मिळ पदार्थ
३९. लाकडाच्या वस्तू करणारा
४१. कापसाचे बी
४२. करकर वाजणारे पायताण
४३. तीव्र स्पर्धा
४४. पात्याची तीक्ष्णता
४७. भव्य, मोठे
४८. जुगार
४९. तप करण्याची जागा
५०. दुर्दैवी
५२. टिकून राहणे, टिकाव
५३. आठवण
५४. नरम नेमस्त
५६. हस्त पण नक्षत्र नव्हे!
५७. कुरापत
५९. प्रियकर, पती
६१. टपाल
६२. आई
६३. चार वेदांपैकी एक
६४. जमाखर्च लिहिण्याची वही
६६. दुग्धजन्य पदार्थ व दूधविक्रीचे दुकान
६९. समजायला सेपे
७०. आवड
७१. हाकेला दिलेला प्रतिसाद
७२. धाक, दरारा
७४. वाहनात सामान ठेवायची जागा (इंग्रजी)
७६. रंक
७७. आयुर्वेदिक केशतेलातली एक वनस्पती
७९. इंद्राची पत्नी
८०. निष्णात
८१. सहजगत्या
८२. वांती
८३. लाट, लहर

**उभे शब्द**

२. वनिता, ४. मैत्रीण
५. श्रीकृष्णाला पोहे नेणारा बालमित्र
६. प्रत्येक
७. असंमती
८. विकत घेणे
९. आईचा भाऊ
१०. जंगली
१२. चिलट
१३. मृत्यू
१५. सुखाचे मोजमाप करणारे धान्य
१६. उघडलेले तोंड
१७. कामधेनू
१८. विश्रांती, थांबणे
१९. ओझेवाहू
२१. योग्य
२३. कमी वजनाचा
२५. विहीर
२५अ. तोंड दाखवणारा
२७. ’--- तो वजीर’
२८. हस्तलिखित
२९. ’------ कोण कामास येतो?’
३१. देव, देणारा, एक आडनाव
३२. रामायणकार
३३. इच्छा, ३४. पृथ्वी
३६. चोरटा आवाज
३७. भांडण
३८. व्रत
४०. सारासार विवेक
४३. विडी
४५. जमीन, पृथ्वी
४६. शंभर
४८. सर्वत्र
५१. ओझे
५२. धष्टपुष्ट
५४. सूर्याचे, सूर्यापासून प्राप्त
५५. तालमीतील मारुती
५८. किंवा
६०. दिन
६२. सुवर्णमृगाचे रुप घेणारा राक्षस
६५. चांदणी
६७. एकाएकी
६८. वीज
६९. चाकू
७३. भांडकुदळ स्त्री
७५. पोपट
७६. हत्ती
७७. वात्सल्य, जादू, भुरळ
७८. हट्ट, लकडा

**जम्बो शब्दकोडे क्र. ९२५ चे उत्तर**

आडवे उत्तर : २.आण ५.सवत ९.जंजाळ ११.चिंचोळा १३.अव्यापारेषुव्यापार १४.रणांगण १५.तर १७.बेडूक १८.लकाकी २०.पाठिराखा २२.बारीक २४.द्विज २५.तरू २७.रव २८.दैव २९.सरकार ३१.महती ३३.क्षय ३५.लांब ३६.टवका ३७.यथाशक्ती ३९.वसन ४२.शनी ४४.कावा ४५.रवा ४७.टक ४९.मग ५०.अदपाव ५२.मातामह ५४.अतिशय ५६.क्रिकेट ५८.जेता ५९.नरमाई ६१.कार ६३.यार ६४.धांदरट ६७.श्वशूर ६९.दाट ७०.खाकरा ७२.मारक ७३.सन ७५.खलबतखाना ७८.जीवन ८०.अनावर ८१.बखेडा ८२.दाव ८३.संवत्सर ८५.जंबूक ८६.डळमळीत ८८.डाली ८९.रोगी ९०.टन ९२.गिटार ९४.सहसा ९६.माष ९८.जवनिका १०१.कोडगा १०३.जलचर १०५.कपाटकरंटा १०६.यमक १०७.रटाळ १०८.अडत १०९.कलंक ११०.तट्टू

उभे उत्तर : १.संचित २.आळा ३.हव्यास ४.मारेकरी ५.सव्याज ६.वपा ७.तरबेज ८.हरकत ९.जंगल १०.जाणकार १२.चोरपावलांनी १६.आरास १९.कीव २१.खारट २२.बारकावा २३.कमतरता २४.द्वितीय २६.रूक्ष ३०.कावकाव ३२.मशक ३४.यव ३८.थाट ४०.समय ४१.नग ४२.शस्त्रक्रिया ४३.गोंद ४६.वामन ४८.प्रतिकार ५०.हरक ५१.पारद ५२.माता ५३.हरक ५५.शर ५७.केरळ ५८.जेट ६०.ईश्वर ६२.घाट ६४.धांदल ६५.रयत ६६.खाक ६८.शुक ६९.दानव ७०.खानावळ ७१.राजी ७२.मानव ७३.सनाथ ७४.अंबर ७५.खडाजंगी ७६.बळकट ७७.खादाड ७९.वसंत ८०अ.रणपिसा ८४.रडारड ८७.मक्षिकापात ८९.रोष ९१.नजर ९३.टाकोटाक ९५.हरकत ९६.मार्जार ९७.चल ९९.निकड १००.शिकस्त १०२.गायक १०३.जळ १०४.चर्या

## उपदेशकथा

### जिद्द

फार वर्षांपूर्वीची गोष्ट. फ्रान्स आणि हॉलंड हे देश एकमेकांचे जबरदस्त शत्रू होते. एकमेकांना पाण्यात पाहत होते. फ्रान्स एक संपन्न, सुसज्ज सैन्य असलेला प्रभावशाली देश होता पण हॉलंडसारख्या कमजोर देशाला काही तो पराभूत करू शकला नाही.

एकदा फ्रान्सने जोरदार हल्ला केला आणि हॉलंडला जेरीस आणले. खूप दिवस युद्ध चालू होते पण हॉलंड पराभूत नव्हता. फ्रान्सच्या त्या वेळच्या १४ व्या लुईने सेनापतीला विचारले, ‘इतके मोठे सैन्यबळ असूनही आपला अजून का विजय होत नाही?’ सेनापती म्हणाला, ‘सर देशाची महानता भौगोलिक आकारावर, साधनसामुग्री, सैन्यावर मोजली जात नाही. देशाचे सामर्थ्य असतं प्रजेच्या चारित्र्यामध्ये, मेहनतीमध्ये, प्रामाणिक कर्तव्यामध्ये. भाडोत्री, विकत घेतलेल्या सैन्याच्या बळावर तुम्ही कुठलीही लढाई जिंकू शकणार नाही. हॉलंडची प्रजा देशप्रेमी आणि जिद्दी आहे.’

कथा उपदेश : कुठलीही लढाई देशप्रेमाने आणि जिद्दीने जिंकू शकते.

## पंचांग

| | |
|---|---|
| बुधवार | शुक्ल पक्ष |
| विक्रम संवत्– २०८२ | तिथि:षष्टी २२:४९:४९ |
| वैशाख शके | नक्षत्र:आर्द्रा २२:१२:४८ |
| संवत्– १९४८ | योग:अतिगण्ड ०९:०७:५२ |
| संवत्सर – पराभवनाम | योग:सुकर्मा ३०:०७:११+ |
| अयन– उत्तरायणारंभ | करण:कौलव १२:०१:३० |
| मास– वैशाख | करण:तैतिल २२:४९:४९ |
| ऋतु– सौर वसंत | सूर्य:मेष |

## : SMS :

U R MY MY BEST
BEST FRIEND
IN MY LIFE
DEAR R U TALKING
WITH ME
ICANT FEEL
ANY PAIN
I CANT LEAVE U
SARAH ICANT MISS U
IN THE PROMISS OF
OUR
FRIENDSHIP

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.१ | २५.७ |
| अहमदनगर | ३५.८ | २४.५ |
| अकोला | ४० | २८.४ |
| अमरावती | ३९.२ | २६.९ |
| बीड | ४२.२ | २७.४ |
| भंडारा | ४०.४ | २९.४ |
| बुलढाणा | ३७.३ | २१.७ |
| चंद्रपूर | ४२.५ | २७.१ |
| चेन्नई | ४३.८ | ३१.६ |
| नवी दिल्ली | ३७.२ | २३.७ |
| धुळे | ३८.४ | २४.२ |
| गोंदिया | ४०.२ | २८ |
| जळगाव | ४०.२ | २७.९ |
| कोल्हापूर | ३७.३ | २३.४ |
| लातूर | ३७.४ | २६ |
| मुंबई | ३७.५ | ३०.७ |
| नागपूर | ३९.२ | २९.८ |
| नांदेड | ३९.९ | २७ |
| नंदूरबार | ३६.६ | २४.५ |
| नाशिक | ३६.३ | २३.४ |
| पुणे | ३४.६ | २२.६ |
| पंढरपूर | ३९ | २६ |
| सातारा | ३६.५ | २४.१ |
| सांगली | ३८.२ | २४.७ |
| सोलापूर | ३८.९ | २६.४ |
| वर्धा | ४१ | २६.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व कौटुंबिक सुख व पत्नीच्या सहयोगाने मन प्रसन्न राहील.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा :दक्षिण व्यवहार कुशलतेमुळे अधिकारी खुष राहतील. वहान सुख मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: पूर्व समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तिंच्या भेटी होतील. व्यापारात आपल्या निर्णयाचा फायदा मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पश्चिम व्यापारातील हेतु साध्य होण्याकरिता अधिक प्रयत्न करावे लागतील.

**मिथुन :** शुभ दिशा: पूर्व व्यवसायिक समस्या दूर होईल. मुलांची प्रगती राहील. वाद विवाद टाळा. रचनात्मक कामामुळे आर्थिक स्थिती सुधारणार आहे.

**धनु :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायीक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल.

**कर्क :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम आर्थिक स्थिती चांगली राहिल्याने मन आनंदी राहील. कौटुंबिक चिंता दूर होऊ शकते.

**मकर :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**सिंह :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण जीवनसाथीच्या प्रगतीमुळे सामाजिक मान सतत वाढणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व बुद्धीमत्तेवर अनेक समस्या दूर होतील. अचानक धनप्राप्ती होण्याचा योग आहे. प्रिय व्यक्तिची गाठ होईल.

**कन्या :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण व्यापारिक संकटामुळे चिंता राहून धावपळ वाढणार आहे. यश कमी मिळणार आहे.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: दक्षिण मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# महाराष्ट्रातील स्मार्ट शेतीच्या विकासाला 'बूस्टर'

## दावोसमधील सामंजस्य करारांतर्गत पुण्यातील न्यूट्रीफ्रेश फार्म्सला ९० कोटींची परदेशी गुंतवणूक प्राप्त

**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अमेरिकेतील इंटरनॅशनल डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन (यूएसआयडीएफसी) संस्थेकडून ९० कोटींची गुंतवणूक प्राप्त झाली आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्र शासन, रूरल एन्हान्सर्स आणि न्यूट्रीफ्रेश फार्म्स यांच्यात नियंत्रित वातावरणातील शेती यासाठी नुकताच २५०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार झाला होता. त्यातील ४०० कोटी रुपयांची गुंवणूक अमेरिकेतून येणार होती आणि त्यापैकी ही ९० कोटींची पहिली गुंतवणूक आली आहे. त्यातून पुणे जिल्ह्यातील भोर, पुरंदर आणि नागपूर येथे प्रकल्प कार्यान्वित होणार



आहेत, अशी माहिती रूरल एन्हान्सर्सचे संस्थापक व सीईओ अंबर आयदे यांनी सांगितली. या गुंतवणुकीमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवण्याच्या दृष्टीकोनाला ठोस जागतिक मान्यता मिळाली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जागतिक स्तरावर तणाव आणि अनिश्चिततेचे वातावरण असतानाही महाराष्ट्रातील कृषी व अन्नसुरक्षा क्षेत्रावर जागतिक गुंतवणूकदारांकडून विश्वास दाखवला जात असल्याचे हे प्रतीक आहे. स्मार्ट शेतीसाठी झालेल्या सामंजस्य करारानंतर महाराष्ट्राला मिळालेली ही पहिली थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आहे. या निधीद्वारे अत्याधुनिक कृषी पायाभूत सुविधा उभारणी, तंत्रज्ञान-आधारित शेती प्रणालींचा विस्तार आणि निर्यात-केंद्रित कृषी पुरवठा साखळी बळकट करण्यात येणार आहे. यामुळे महाराष्ट्र उच्च कार्यक्षमतेच्या आणि तंत्रज्ञानाधारित शेतीसाठी जागतिक केंद्र म्हणून उदयास येईल. यासह उत्पादनक्षमता, पाणी वापर कार्यक्षमता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र आता हवामान-प्रतिरोधक कृषी आणि अन्न प्रणाली क्षेत्रातील जागतिक गुंतवणुकीसाठी अग्रक्रमाचे राज्य म्हणून अधिक बळकट होईल, असे अंबर आयदे यांनी सांगितले.

न्यूट्रीफ्रेश फार्म्सचे सहसंस्थापक गणेश निकम म्हणाले, या भांडवली गुंतवणुकीमुळे नियंत्रित वातावरणीय शेती (सीईए) पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळणार आहे. यामुळे अचूक तंत्रज्ञानाधारित शेती, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि पिकांच्या उत्पादनक्षमतेत वाढ साध्य होईल. तसेच, या उपक्रमाद्वारे निर्यातक्षम कृषी पुरवठा साखळी अधिक बळकट करण्याचे उद्दिष्ट असून, राज्याला उच्च कार्यक्षमतेच्या शेतीचे केंद्र म्हणून विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

न्यूट्रिफ्रेश फार्म्सचे सह-संस्थापक संकेत मेहता यांनी सांगितले की, रूरल एन्हान्सर्स ग्रुपचे अंबर आयदे यांच्या नेतृत्वाखालील भागीदारीमुळे प्रत्यक्ष पातळीवर प्रभावी परिणाम दिसून येतील. येत्या काही महिन्यांत महाराष्ट्राला या उपक्रमाचे ठोस परिणाम अनुभवायला मिळतील. हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस हातभार लावण्यासोबतच शाश्वत कृषी पद्धतींना चालना देईल.

# आरक्षणाच्या लढ्याला यश: ३३ हजार हरकतींचा टप्पा पार

## पुण्यात २६ एप्रिलला संयुक्त गोलमेज परिषद

**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावित अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात सुरू असलेल्या लोकचळवळीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'महाराष्ट्र अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समिती' (पद्मपाणी फाउंडेशन) तसेच विविध पक्ष, संघटना व सामाजिक संस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आतापर्यंत प्रशासनाकडे ३३,००० पेक्षा अधिक हरकती ईमेलद्वारे प्राप्त झाल्या आहेत. ही संख्या समाजातील तीव्र अस्वस्थता आणि वाढती जागृती दर्शवणारी मानली जात आहे.



आज पुनर्विलोकन समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बार्टी (BARTI), पुणे येथील निबंधकांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीतून दोन महत्त्वाचे मुद्दे समोर आले.

प्रथम, उपवर्गीकरणाविरोधात पाठविण्यात आलेल्या प्रत्येक हरकतीला प्रशासनाकडून अधिकृत पोहच (Acknowledgment) दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. यामुळे प्रत्येक हरकतीची अधिकृत नोंद होणार असून प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दुसरे म्हणजे, न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. समितीने अहवाल तयार करताना पारदर्शकता न ठेवता जनभावनांचा पुरेसा विचार केला नाही, तसेच संपूर्ण प्रक्रिया गोपनीय ठेवली, असा आरोप करण्यात आला. त्यामुळे हा अहवाल नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना धरून नसल्याची टीका करण्यात आली.

राहुल डंबाळे यांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, "या ३३ हजार हरकती केवळ तांत्रिक बाब म्हणून न पाहता, त्यामागील सामाजिक भावना आणि कायदेशीर मुद्द्यांचा गांभीर्याने विचार करावा. बदर समितीने जनतेला मत मांडण्याची संधी का दिली नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

# पुणे महापालिकेत वित्तीय समितीवरून वाद

**पुणे (दै. संध्या)**

महापालिकेतील विकासकामांचा वेग आणि त्यासाठी असलेली वित्तीय समिती, यावरून प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये पुन्हा एकदा जोरदार वाद रंगला. सोमवारी (दि.20) झालेल्या सर्वसाधारण सभेत समितीमुळे कामे अडकत असल्याचा आरोप नगरसेवकांनी केला, तर कामांना प्राधान्य देणे, हा प्रशासनाचा अधिकार असल्याचे स्पष्ट करत समिती गरजेची असल्याची आयुक्त नवल किशोर राम यांनी ठाम भूमिका मांडली. या वादामुळे सभागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

सभेच्या सुरुवातीलाच भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक पृथ्वीराज सुतार यांनी विषय उपस्थित करत सभागृह अस्तित्वात आल्यानंतरही वित्तीय समिती सुरू ठेवण्याचे कारण काय? असा प्रश्न विचारला. या समितीमुळे अनेक कामे रखडत असल्याचा आरोप करीत त्यांनी मागील बैठकीतील आश्वासनांचीही आठवण करून दिली. 'आम्ही निधीची तरतूद करूनही कामे वर्षानुवर्षे का पूर्ण होत नाहीत?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. स

मिती रद्द करण्याच्या मागणीवर आयुक्त नवल किशोर राम यांनी आपली भूमिका अधिक स्पष्ट करत म्हटले की, वित्तीय समिती ठेवणे अथवा तिचे स्वरूप बदलणे, हा प्रशासनाचा अधिकार आहे. आवश्यक वाटल्यास समितीचे नाव 'विशेष नियंत्रण समिती' असेही करता येईल. वित्तीय समिती आवश्यक असून, दर सोमवारी स्वतः बैठक घेऊन कामांचा आढावा घेत आहे. तसेच, कोणत्याही विशिष्ट कामाबाबत तक्रार असल्यास ती स्वतंत्रपणे ऐकण्याची आपली तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

# 'लव्ह जिहाद', 'धार्मिक दहशत' आणि 'धर्मांतर रॅकेट'चा पर्दाफाश करा !

**पुणे (दै. संध्या)**

बहुराष्ट्रीय कंपनीत हिंदू महिला कर्मचाऱ्यांचे झालेले लैंगिक शोषण, धर्मांतरासाठी दिलेला दबाव आणि गोमांस भक्षणाची केलेली सक्ती, हे प्रकार म्हणजे एका मोठ्या 'कॉर्पोरेट जिहाद'चे भीषण स्वरूप आहे. हे विखारी जाळे केवळ नाशिकपुरते मर्यादित नसून मुंबई आणि पुण्यातील आयटी कंपन्यांमध्येही पसरल्याची दाट शक्यता आहे. या संघटित गुन्हेगारीचा आणि धर्मांतर रॅकेटचा पर्दाफाश करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशा मागण्यांकरिता हिंदु जनजागृती समितीच्या वतीने आज दिनांक 20 एप्रिल रोजी सायंकाळी 5.30 वाजता शहीद हेमंत करकरे चौक, फिनिक्स मॉलजवळ, विमान नगर कॉर्नर, नगर रोड, पुणे येथे हिंदु राष्ट्र जागृती आंदोलन घेण्यात आले.

या वेळी आंदोलनात बहुसंख्येने धर्माभिमानी सहभागी झाले होते. तसेच या वेळी विविध मागण्याचे निवेदन सिद्ध करून धर्माभिमान्यांच्या सह्या घेण्यात आल्या. सह्यांचे निवेदन मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी आणि पोलिस प्रशासनाला देण्यात येणार आहे, असे हिंदु जनजागृती समितीचे पराग गोखले यांनी सांगितले.

आंदोलनामध्ये चार्टर्ड अकाउंटंट आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर श्री. सर्वेश मेहेंदळे, प्रखर हिंदुत्वनिष्ठ आणि समाज प्रबोधनकार श्री. सुशांत गाडे, बार असोसिएशन पुणे न्यायालयचे सदस्य अधिवक्ता श्री. राहुल कदम, हिंदू जनजागृती समितीचे श्री. पराग गोखले, हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे पुणे जिल्हा समन्वयक श्री. सचिन घुले, रणरागिणी शाखेच्या कु. क्रांती पेटकर, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे पुणे जिल्हा समन्वयक श्री. दत्तात्रय चोरघे महाराज तसेच विविध संघटनांचे मान्यवर उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना या विषयातील गंभीरतेवर मार्गदर्शन केले.

नाशिक येथील सदर कंपनीतून 7 आरोपींना अटक झाली आहे. नाशिकमध्ये 7 सापडले, तर अन्य शहरात किती असतील ? ज्या कंपन्यांमध्ये हिंदू महिलांच्या अब्रूचे रक्षण होत नाही आणि जिथे 'धार्मिक दहशत' निर्माण केली जाते.





# पालखी मुक्काम स्थळाच्या सोयी-सुविधांची पाहणी

## डॉ. कल्याण गंगवाल यांचे आवाहन; बैलगाडा शर्यती भरविताना डॉक्टरसह अन्य सुविधा उपलब्ध करण्याची मागणी

**पुणे (दै. संध्या)**

भवानी पेठ येथील पालखी मुक्काम स्थळाची आज प्रशासकीय पातळीवर सविस्तर पाहणी करण्यात आली. आषाढी वारी दरम्यान पुण्यात विसावणाऱ्या पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना अधिकाधिक दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध विभागांच्या कामांचा आढावा घेण्यात आला.

मुक्काम स्थळी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था राहील याची खात्री करण्यात आली. तसेच फिरत्या शौचालयांसाठी नियोजित जागांची पाहणी करून स्वच्छता व सुशोभीकरणाबाबत संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. रस्ते दुरुस्ती: पालखी मार्गावरील तसेच मुक्काम स्थळ परिसरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व डागडुजी करून प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ करण्याचे निर्देश देण्यात आले.

विद्युत व्यवस्था: रस्त्यात अडथळा निर्माण करणारे दिव्यांचे खांब त्वरित हलवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्याचे आदेश देण्यात आले.

आरोग्य सुविधा: वारी कालावधीत २४ तास कार्यरत राहणाऱ्या आरोग्य पथकांसाठी योग्य जागेची निश्चिती करण्यात आली असून आवश्यक वैद्यकीय सुविधा सज्ज ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

या पाहणीचा मुख्य उद्देश विद्यमान सोयी-सुविधांची गुणवत्ता तपासून तांत्रिक त्रुटी दूर करणे हा होता. पालखी सोहळा हा भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू असल्याने मुक्काम स्थळी उत्कृष्ट व शिस्तबद्ध व्यवस्था निर्माण करण्यावर प्रशासनाचा विशेष भर आहे. सर्व सुविधा नियोजित पद्धतीने अधिक सक्षम करण्यासाठी संबंधित विभागांना समन्वयाने काम करण्याचे आदेश देण्यात आले असून भाविकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी माननीय महापौर मा. सौ. मंजुषाताई नागपुरे यांच्या समवेत मा. आमदार श्री. हेमंतजी रासने, स्थायी समिती अध्यक्ष मा. श्री. श्रीनाथजी भिमाले, महापालिका आयुक्त मा. श्री. नवल किशोर राम, अतिरिक्त महापालिका आयुक्त श्री. प्रजित नायर, नगरसेवक मा. श्री. विशाल धनवडे, नगरसेविका सौ. पल्लवीताई जावळे, स्वीकृत नगरसेवक मा. श्री. राजेंद्र काकडे, मंदिराचे विश्वस्त श्री. गोरख भिकुले, श्री. प्रमोद भेंगरूट, भारतीय वारकरी मंडळाचे अध्यक्ष श्री. धनंजय बडदे, श्री. पावसकर (सीटीई) तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### रेकॉनचे शुद्ध दिव्याचे तेल 'मंगलमय' आता झेप्टो, स्विगी इन्स्टामार्ट आणि बिग बास्केटवर

पुणे (दैनिक संध्या) : 'मंगलमय' हे दिव्याचे तेल आता इन्स्टंट डिलिव्हरीसाठी १३ प्रमुख शहरांमध्ये उपलब्ध असून दैनंदिन आध्यात्मिक परंपरांचे पालन सहज शक्य होणार आहे. प्रीमियम खाद्यतेल आणि दिव्याच्या तेलाचे अग्रगण्य उत्पादक रेकॉन ऑईल इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड यांनी त्यांच्या लोकप्रिय 'मंगलमय' दिवा तेलाच्या उपलब्धतेची घोषणा केली आहे. हे उत्पादन आता झेप्टो, स्विगी इन्स्टामार्ट आणि बिग बास्केटवर उपलब्ध आहे. या धोरणात्मक विस्तारामुळे हैदराबाद, पुणे, मुंबई, नवी मुंबई, नागपूर, विशाखापट्टणम, गुरुग्राम, विजयवाडा, अहमदाबाद, रायपूर, वडोदरा, सुरत, नोएडा आणि दिल्ली या शहरांमधील ग्राहकांपर्यंत ब्रँड अधिक वेगाने पोहोचणार असून 'प्रत्येक दिवस मंगलमय' ही संकल्पना अधिक बळकट होणार आहे. निसर्गातील चांगुलपणा ग्राहकांच्या दैनंदिन जीवनात आणण्याच्या उद्देशाने रेकॉनने क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म्ससोबत भागीदारी केली आहे. या प्लॅटफॉर्म्सवर उपलब्धतेमुळे पूजा-विधींमध्ये आवश्यक असलेली उत्पादने काही मिनिटांत घरपोच मिळतात, ज्यामुळे आधुनिक ग्राहकांच्या जीवनशैलीत सोयीसह परंपरेचे जतन करता येते. मौल्यवान भारतीय परंपरांना पूरक उत्पादने देत 'मंगलमय'ने आपल्या श्रेणीत एक अग्रगण्य स्थान निर्माण केले आहे. या विस्ताराचा उद्देश शहरी आणि निमशहरी कुटुंबांपर्यंत दैनंदिन पूजेच्या आवश्यक वस्तू सहज उपलब्ध करून देणे हा आहे. मंगलमय पूजा तेल पारंपरिक दिवा प्रज्वलनासाठी विशेष विकसित करण्यात आले आहे. हे वनस्पती-आधारित असून त्यात तिळाच्या तेलाचे गुणधर्म आहेत. पॅराफिनमुक्त असल्यामुळे या तेलापासून काजळी निर्माण होत नाही आणि त्याची ज्योत शांत व स्थिर राहते. त्यामुळे हे तेल दैनंदिन पूजा तसेच सणासुदीच्या प्रसंगांसाठी अत्यंत योग्य आहे. भारतीय परंपरांशी नाते जपत हे उत्पादन आधुनिक घरांमध्ये शुद्धता, सातत्य आणि सुरक्षिततेची गरज पूर्ण करते. ग्राहकांमध्ये जलद आणि विश्वासार्ह डिलिव्हरीची वाढती गरज लक्षात घेता, रेकॉनच्या या विस्तारामुळे 'मंगलमय' काही मिनिटांत घरपोच उपलब्ध होत आहे. गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता सुलभता वाढवण्यावर कंपनीचा भर आहे. हे उत्पादन १५० मिली, ४५० मिली आणि ९०० मिली या विविध पॅकमध्ये उपलब्ध असून घरगुती वापराच्या विविध गरजांची पूर्तता करते. कंपनीच्या वरिष्ठ प्रवक्त्यांनी सांगितले, निसर्गाशी नाते जपत आणि स्पष्ट उद्देशाने प्रेरित रेकॉन गेली ३० वर्षे प्रीमियम तेलांद्वारे ग्राहकांपर्यंत निसर्गातील सर्वोत्तम गुण पोहोचवत आहे. 'मंगलमय' दिव्याचे तेल हे केवळ उत्पादन नसून भारताच्या आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक आहे. झेप्टो, स्विगी इन्स्टामार्ट आणि बिग बास्केटवर उपलब्धतेमुळे आम्ही आमच्या ग्राहकांना दिलेले आणखी एक वचन पूर्ण करत आहोत ते म्हणजे सर्वोत्तम दर्जाचे दिव्याचे तेल त्यांच्या दारापर्यंत जलद पोहोचवणे. क्विक-कॉमर्सचा स्वीकार हा आधुनिक काळातील एक महत्त्वाचा टप्पा असून यामुळे भक्तीची ज्योत कधीही मंदावणार नाही.

### प्रसेनजीत फडणवीस यांचा सन्मान सोहळा

पुणे (दैनिक संध्या) : बँक ऑफ महाराष्ट्राच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल प्रसेनजीत फडणवीस यांचा सन्मान आणि अभिनंदन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. आधार सोशल फाउंडेशन आणि प्रसेनजीत फडणवीस मित्र परिवार यांच्यावतीने मंगळवार, दिनांक २१ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता डेक्कन येथील गोखले इन्स्टिट्यूट जवळील मानव विकास संस्था (सारथी) पुणे येथे सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रिझर्व बँक ऑफ इंडिया सेंट्रल बोर्डचे संचालक सतीश मराठे यांच्या हस्ते प्रसेनजीत फडणवीस यांचा सन्मान होणार आहे. यावेळी महाराष्ट्र प्रदेश भाजप महामंत्री राजेश पांडे, जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष राजेंद्र हिरेमठ, रायगडचे निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, आमदार हेमंत रासने, सुनील कांबळे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष रवींद्र हेजीब, राज्य सह. निवडणूक प्राधिकरणाचे निवृत्त सह आयुक्त संजय खडके यांची प्रमुख उपस्थिती यावेळी असणार आहे, अशी माहिती आयोजक दिलीप काळोखे यांनी दिली.



### पुण्यातील आयटीआय 'दक्ष' प्रकल्पात; कौशल्य विकासाला नवी चालना

पुणे (दैनिक संध्या) : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आयटीआय) दर्जा उंचाविण्यासाठी दक्ष प्रकल्पांतर्गत राज्यातील 54 आयटीआयची 'दक्ष आयटीआय' म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यात अमरावती आणि पुणे विभागातील प्रत्येकी आठ, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर या विभागातील प्रत्येकी दहा, नाशिक विभागातील सात संस्थांचा समावेश आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. राज्यात दक्ष हा प्रकल्प 5 फेब्रुवारीपासून कार्यान्वित झाला आहे. 'हब अँड स्पोक्स क्लस्टर मॉडेल'अंतर्गत देशभरातील 'आयटीआय'चा दर्जा उंचाविण्यासाठी 'पीएम-सेतू' ही योजनाही सुरू करण्यात आली आहे. तसेच, राज्यातील शासकीय 'आयटीआय'च्या विकासासाठी 'आशियाई विकास बँके'कडून 'महादृष्टी' प्रकल्प भविष्यात प्रस्तावित आहे. या तिन्ही योजनांच्या माध्यमातून राज्यातील शासकीय 'आयटीआय'चा दर्जा उंचाविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर, दक्ष प्रकल्पांतर्गत राज्यातील शासकीय 'आयटीआय'ची निवड करण्यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने 'औद्योगिक प्रशिक्षण संस्था क्रमवारी आराखडा' तयार केला. त्यात संस्थात्मक क्षमता, प्रशासन, शिक्षण, सक्षमीकरण, पर्यावरण, उद्योग सहभाग, विद्यार्थी समर्थन, प्रगती, समता, समावेशन, प्रशिक्षण आणि निकाल अशा 89 निकषांचा समावेश आहे. या निकषांसह प्रादेशिक समानतेचा विचार करून उत्तम आणि मध्यम श्रेणीतील 54 शासकीय 'आयटीआय'ची निवड करण्यात आली आहे. निवड केलेल्या 54 शासकीय 'आयटीआय'पैकी अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ या जिल्ह्यांतील प्रत्येकी दोन, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यातील प्रत्येकी एक, छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, परभणी या जिल्ह्यांतील प्रत्येकी एका संस्थेचा समावेश आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## तीन-चाकी इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार करण्यासाठी ह्युंदाई आणि टीव्हीएस यांची भागीदारी

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : भारताच्या 'लास्ट-माईल मोबिलिटी'च्या आवश्यकता पूर्ण करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या, नावीन्यपूर्ण इलेक्ट्रिक तीन-चाकी वाहनांच्या (E3W) उपायांचा विकास आणि त्यांचे व्यापारीकरणाला चालना देण्यासाठी ह्युंदाई मोटर कंपनी (Hyundai Motor) आणि टीव्हीएस मोटर कंपनी लिमिटेड (TVS Motor) यांनी एका संयुक्त विकास करारावर (JDA) स्वाक्षरी केली आहे. भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो 2025' मध्ये E3W संकल्पनेचे यशस्वी सादरीकरण झाल्यानंतर ही भागीदारी करण्यात आली. भारतीय ग्राहकांसाठी योग्य गतिशीलता पर्याय उपलब्ध करून देण्याच्या दिशेने ही भागीदारी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. तसेच, शाश्वत शहरी वाहतुकीप्रती दोन्ही कंपन्यांची कटिबद्धता अधिक दृढ करते.या करारानुसार, संशोधन आणि विकास क्षेत्रातील नैपुण्य, प्रगत गतिशीलता तंत्रज्ञान आणि मानवकेंद्रित रचनात्मक दृष्टिकोनाचा लाभ घेत, ह्युंदाई मोटर्स E3W च्या रचनेचे नेतृत्व करेल आणि त्याचा संयुक्तपणे विकास करेल. "ह्युंदाई मोटर कंपनीने भारताला एक प्रमुख बाजारपेठ मानून, येथील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी योगदान देण्याच्या विविध मार्गांचा दीर्घकाळापासून शोध घेतला आहे; आणि टीव्हीएस मोटर सोबतची आमची ही भागीदारी, याच प्रयत्नांतून घेतलेला एक धोरणात्मक निर्णय आहे. या संयुक्तपणे विकसित केलेल्या E3W मुळे देशभरातील लोकांना अधिक सुरक्षित आणि शाश्वत वाहतूक व्यवस्थेचा लाभ घेणे अधिक सुलभ होईल, अशी आशा आम्हाला आहे." – जुंगसून को, वरिष्ठ उपाध्यक्ष, कॉर्पोरेट रणनिती आणि नियोजन, ह्युंदाई मोटर कंपनी. भारतातील वाहतुकीशी संबंधित वेगवेगळ्या आव्हानांवर मात करता येईल अशाचप्रकारे E3W ची रचना केली जाईल; तसेच स्थानिक रस्त्यांची स्थिती आणि शहरी पायाभूत सुविधांशी सुसंगत असे शाश्वत उपाय उपलब्ध करून देता येतील.आपल्या अत्याधुनिक इलेक्ट्रिक प्लॅटफॉर्मचा, तीन-चाकी वाहनांच्या अभियांत्रिकी क्षेत्रातील सखोल अनुभवाचा आणि स्थानिक बाजारपेठेच्या सखोल ज्ञानाचा वापर करून टीव्हीएस मोटर या उत्पादनाचा संयुक्तपणे विकास करेल. विश्वास आणि गुणवत्तेवर भर देण्याच्या आपल्या दीर्घकालीन परंपरेचा आधार घेत, टीव्हीएस या वाहनाच्या स्थानिक विक्रीचे नेतृत्वही करेल; तसेच भारतातीलच आपल्या उत्पादन सुविधांद्वारे भारतीय बाजारपेठेची मागणी आणि भविष्यातील निर्यातीची पूर्तता करेल. या घडामोडीवर भाष्य करताना, टीव्हीएस मोटर कंपनीचे ग्रुप स्ट्रॅटेजी विभागाचे अध्यक्ष, शरद मिश्रा म्हणाले, "शाश्वत आणि सुलभ गतिशीलतेद्वारे जीवनमान उंचावण्याचे आमचे ध्येय आहे. हा संयुक्त विकास करार ह्युंदाई मोटर कंपनीसोबतच्या आमच्या भागीदारीतील एक महत्त्वाचे पाऊल आहे आणि इलेक्ट्रिक तीन-चाकी पर्याय विकसित करण्याच्या आमच्या सामाईक महत्त्वाकांक्षेला पुढे नेतो. आमचा तीन-चाकी इलेक्ट्रिक प्लॅटफॉर्म, अभियांत्रिकी कौशल्य आणि ग्राहकांच्या गरजांची सखोल जाण यांसारख्या पूरक क्षमतांना एकत्र आणून, आम्ही भारत आणि इतर बाजारपेठांसाठी विशेष उत्पादने वितरीत करण्यास सुसज्ज आहोत. हे सहकार्य विस्तारक्षम, दीर्घकालीन लास्ट-माईल गतिशीलतेप्रती आमची वचनबद्धता अधिक दृढ करते, तसेच तंत्रज्ञान, गुणवत्ता, ग्राहक अनुभव आणि विश्वासाचा वारसा यांमध्ये नवीन मापदंड निर्माण करते."

## भक्तीच्या दारात वसुलीचा 'बाजार'! करणी माता मंदिरात युट्युबर्सची लूट

बीकानेर (दैनिक संध्या) : भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या राजस्थानच्या करणी माता मंदिरात एका विदेशी युट्युबरला आलेला अनुभव मंदिर प्रशासनाच्या 'व्यावसायिक' धोरणाचे वाभाडे काढणारा ठरला आहे. "तुम्ही युट्युबर असाल तर ११०० रुपये द्या", असा आदेशच येथे काढण्यात आला असून, भक्तीच्या नावाखाली ही एक प्रकारची सक्तीची वसुली असल्याचे विदेशी युट्युबरने म्हटले आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. साध्या मोबाईल किंवा कॅमेऱ्यासाठी ३० ते ७० रुपये घेणारे मंदिर प्रशासन युट्युबर समोर येताच थेट १,१०० रुपयांची मागणी करते. एका विदेशी पर्यटकाने मंदिरात चित्रीकरण करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याला या अजब नियमाचा फटका बसला. विशेष म्हणजे, या पर्यटकाने आधीच ५०० रुपये स्वेच्छेने देणगी दिली होती, तरीही प्रशासनाने त्याच्याकडून 'युट्युबर' असल्याच्या नावाखाली अतिरिक्त पैसे उकळले. फलकावर साधा व्हिडिओ: ७० रुपये, युट्युब व्हिडिओ: १,१०० रुपये, डॉक्युमेंटरी: २५,००० रुपये असे दरपत्रकच देण्यात आले आहे. संबंधित युट्युबरने जेव्हा एवढ्या मोठ्या रकमेबद्दल जाब विचारला, तेव्हा मंदिर प्रशासनाकडून सांगण्यात आले की, "हे पैसे मंदिरासाठी आहेत."

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद फुरसुंगी,
ता. हवेली, जि. पुणे-४१२३०८
ई-मेल: fursungi.urulidevachinp2024@gmail.com

न प फ.ऊ. देवाची/सूचना - ९७/२०२६-२७ दिनांक-२१/०४/२०२६

जाहीर सूचना

नगर परिषद कार्यालय फुरसुंगी उरुळी देवाची या कार्यालयाचे हद्दीत असणारे दैनिक व आठवडी बाजार चे दैनिक वसुली चा ठेका वार्षिक पद्धतीने देणे प्रस्तावित आहे. सदरहू हर्रास हि संगणकीय (ई - लिलाव) पद्धतीने होणार आहे. - तरी (ई - लिलाव) प्रक्रिया, हर्रास अटी व शर्ती बाबत चर्चा करणेसाठी न प कार्यालय फुरसुंगी उरुळी देवाची येथे दिनांक २७/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आलेली आहे तरी इच्छुक लिलाव धारकांनी उपस्थित रहावे. जा.क्र -९७/२०२६-२७.
दिनांक २१/०४/२०२६

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
फुरसुंगी-उरुळीदेवाची, नगरपरिषद

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, फ्लॅट क्र. 10, बिल्डिंग क्र. एफ, अयोध्यानगरी क्र. 2 को ऑपेराटीव्ह हौसिंग सोसायटी, सर्वे क्र. 40-ए-1/1, सिटी सर्वे क्र. 1496 बोपोडी, पुणे हि मिळकत विद्यमान मालक श्री. निशिकांत राजाराम लोले यांचे मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची आहे. प्रस्तुतचे श्री. निशिकांत राजाराम लोले हे अयोध्यानगरी क्र. 2 को ऑपेराटीव्ह हौसिंग सोसायटी चे सभासद असून सदर फ्लॅट क्र. 10 संदर्भात मूळ शेअर सर्टिफिकेट यासी क्र. 2 हे गहाळ झालेले/हरविलेले आहे. सबब सदर मूळ शेअर सर्टिफिकेट कोणास सापडले अथवा कोणाच्या ताब्यात असल्यास किंवा कोणास मिळून आल्यास त्यांनी आमचेशी खालील पत्त्यावर संपर्क करून सात दिवसांच्या कालावधीत आणून द्यावे. सदरील मूळ शेअर सर्टिफिकेट हरविले असून तिचा कोणत्याही कारणास्तव केला गेलेला वापर हा ग्राह्य धरला जाणार नाही.

सबब प्रस्तुतची जाहीर नोटीस पुणे येथे दिनांक 21.04.2026 रोजी दिली असे.

सही/-
ॲड. मनीष ब. मांडेकर,
ऑफिस क्र. 9, पूर्वा अपार्टमेंट, शिवाजीनगर, पुणे - 411005
मोबाइल क्र. - 9623284222

# इंडिया पोस्टची मोठी झेप; महसूल 15,296 कोटींवर

## टपाल विभागाच्या वार्षिक आढावा बैठकीत केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी ही माहिती दिली

नवी दिल्ली (दै. संध्या) :

नवी दिल्ली : इंडिया पोस्टने आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये महसुलात मोठी झेप घेतली आहे. इंडिया पोस्टने 15,296 कोटी रुपयांचा महसूल मिळवला आहे. गेल्या वर्षीच्या 13,218 कोटी रुपयांच्या तुलनेत यामध्ये 16 टक्क्यांची वाढ झाली आहे. अनेक वर्षांनंतर प्रथमच महसूल वाढीचा दर 15 टक्क्यांच्या पुढे गेला आहे. टपाल विभागाच्या वार्षिक आढावा बैठकीत केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी ही माहिती दिली.

ही वाढ विभागाच्या मुख्य सहा क्षेत्रांमधील उत्तम कामगिरीमुळे झाली आहे.

यामध्ये पार्सल, मेल, आंतरराष्ट्रीय मेल, पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँक, टपाल जीवन विमा आणि नागरिक केंद्रित सेवांचा समावेश आहे.




ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले की, इंडिया पोस्ट आता केवळ खर्चाचे खाते न राहता महसूल आधारित संस्था बनत आहे. तथापि लॉजिस्टिक्स क्षमता वाढवणे, पार्सल सेवांचा विस्तार आणि मेल सेवा अधिक मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला.

तसेच डिजिटल तंत्रज्ञान, डेटावर आधारित निर्णय आणि प्रादेशिक रणनीती ही भविष्यातील यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले.

ई-कॉमर्स कंपन्यांसोबतची भागीदारी आणि सरकारी सेवांच्या विस्तारामुळे इंडिया पोस्टची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत आहे. कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे कौतुक करत त्यांनी डाक सेवा, जन सेवा हे ध्येय पुढे नेण्याचे आवाहन केले.

विभागवार वाढलेली टक्केवारी : पार्सल 69 टक्के, टपाल 34, नागरी सेवा 70, टपाल जीवन विमा 25, सेव्हिंग बँक 13 टक्के.


# प्रचंड उष्मा! १४९ वर्षापूर्वीच्या मेगा अल नीनोची पुनरावृत्ती

## तब्बल ४ टक्के लोकसंख्येची झाली होती वाफ

नवी दिल्ली (दै. संध्या) :

जगात १८७७ नंतरचा सर्वात शक्तीशाली अल नीनो तयार होत आहे. त्यावेळी संपूर्ण जगात उष्णतेची लाट आली होती. अनेक ठिकाणी दुष्काळ, महामारी पसरली होती. यात पृथ्वीवरील जवळपास ४ टक्के लोकसंख्या कमी झाली होती. आता शास्त्रज्ञांनी २०२६ - २७ मध्ये याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता वर्तवली आहे.

अल नीनो ही एक नैसिर्गिक हवामानासंदर्भातील घटना असते. यात पॅसिफिक महासागरातील उष्णकंटीबंधीय भागातील पाणी असामान्य पद्धतीनं गरम होतं. सामान्य अल नीनो प्रत्येक २ ते ७ वर्षात येतात. मात्र यावेळी सुपर किंवा मेगा स्ताराचा अल नीनो तयार होत आहे. समुद्रातील उष्टतेची लाट पॉझिटिव्ह पॅसिफिक मेरिडियनल मोड आणि उष्ण दक्षिणी हवा ही त्याची कराणे आहेत.




### शास्त्रज्ञांचा इशारा

बेन नॉल सारख्या हवामान शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार या उष्णतेच्या लाटा अल नीनोला अजूनच बळ देत आहेत. उष्णता आणि आद्रता वाढल्यामुळं पश्चिमेकडील देशांमध्ये उष्णता वाढली असून उष्णतेच्या लाटा वेगवान होऊ शकतात. गेल्या १४० वर्षात असा पॅटर्न तयार झाला नव्हता आता तो होत आहे असं शास्त्रज्ञांचे मत आहे.

सध्याच्या घडीला पॅसिफिक महासागरात ८०४६ किलोमीटर लांब उष्णतेची लाट पसरली आहे. ही माईक्रोनेशियापासून सुरू होते ते कॅलिफोर्नियापर्यंत पोहचत आहे. कॅलिफोर्नियाच्या जवळ याला ब्लॉब असं म्हटलं गेलं आहे. इथं समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान रेकॉर्ड स्तरावर पोहचलं आहे. NOAA च्या अहवालानुसार ही लाट ज्या स्तरावर तयार होत आहे ती महाकाय आहे.

ही लाट अल नीनोला वेगानं बळ देत आहे. त्यामुळं याचा परिणाम समुद्रातील जीवांवर पडत आहे. हवामानाचा पॅटर्न पूर्णपणे बदलत आहे. वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार ही उष्णतेची लाट अल नीनोला अजून वाढवू शकते. त्यामुळं संपूर्ण वर्षभर हवामान अनियमीत राहू शकते.

### १८८७ पेक्षाही मोठा अल नीनो?

१८७७ - ७८ मध्ये अल नीनो इतिहासात सर्वात विनाशकारी अल नीनो ठरला होता. त्याच्या उष्णतेच्या लाटांमुळे दुष्काळ आणि पीकांचे मोठे नुकसान झाले होते. लाखो लोकांचा जीव गेला होता. आता शास्त्रज्ञांच्या मते २०२६ मधील अल नीनो हा त्यापेक्षाही शक्तीशाली असण्याची शक्यता आहे. एप्रिल २०२६ च्या हवामान मॉडल्समध्ये शास्त्रज्ञ हार्ट पल्पिटेशंस जाणवत आहे. जर सुपर अल नीनो तयार झाले तर २०२७ मध्ये जागतिक तापमान नव्या रेकॉर्ड ब्रेक स्तरावर पोहचू शकतं. जागतिक हवामान बदलाच्या काळात हे जास्तच धोकादायक होऊ शकतं.

### जगभरात कुठं होणार परिणाम?

अल नीनोचा प्रभाव हा संपूर्ण जगावर पडणार आहे. त्यात ऑस्ट्रेलिया, दक्षिण आणि मध्ये अफ्रिका, भारत आणि अमेझॉनचे जंगल या ठिकाणी दुष्काळ आणि भयानक उष्णता वाढण्याची शक्यता आहे. तसेच आग लागण्याची देखील मोठी शक्यता आहे. अमेरिकेच्या दक्षिण भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळं इथं मोठ्या प्रमाणावर पूर येऊ शकतो.

### भारतावर काय परिणाम?

भारत हा मेगा अल नीनोचा सर्वात जास्त प्रभाव पडणारा देश आहे. शास्त्रज्ञांच्या मते २०२६ च्या उन्हाळ्यात तापमान सामान्य स्तरापेक्षा खूप वाढणार आहे. दिल्ली, एनसीआर, राजस्थान आणि उत्तर भारतात एप्रिल महिन्यातच तापमान ४० डिग्री सेल्सियसपर्यंत पोहचलं आहे. अल नीनोमुळे मानसूपूर्वीची उष्णता अजून भयानक होण्याची शक्यता आहे.

जून ते सप्टेंबर महिन्यात मान्सून फारसा प्रभावी असणार नाही. त्यामुळं दुष्काळ पडण्याची शक्यता आहे. उत्तर आणि पश्चिम भारतात दुष्काळासारखी स्थिती निर्माण होऊ शकते. कृषी क्षेत्र प्रभावित होऊ शकतं. उन्हाळा लांबू शकतो आणि तीव्र होऊ शकतो. वातावरणात आद्रता जास्त असेल त्यामुळं एकूण उन्हाळ्यात तापमान वाढेलच तसेच लोकांना प्रचंड उष्णतेचा सामना करावा लागेल.



## उष्णलहरीमुळे पशुधनाला धोका; तातडीच्या उपाययोजना आवश्यक

वाशिम (दै. संध्या) :

जागतिक तापमान वाढीच्या पार्श्वभूमीवर यावर्षी उन्हाळ्यातील तापमान नेहमीच्या सरासरीपेक्षा किमान 1 ते 2 अंश सेल्सियसने वाढले आहे. याचा थेट परिणाम पशुधन व कुक्कुट पक्ष्यांवर होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघात (हीट स्ट्रोक) व उष्णलहरींचा धोका निर्माण झाला असून, पशुधन आजारी पडणे किंवा दगावण्याची शक्यता वाढली आहे.

तज्ज्ञांच्या माहितीनुसार, सलग तीन दिवस किंवा त्यापेक्षा जास्त काळ सरासरीपेक्षा अधिक तापमान राहिल्यास उष्णलहरीची स्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत पशुधनाच्या शरीरातील पाणी व क्षारांचे प्रमाण कमी होऊन निर्जलीकरण (डिहायड्रेशन) होते. परिणामी चारा व खाद्य घेण्याचे प्रमाण घटते व उत्पादकतेवर विपरीत परिणाम होतो.

उष्णलहरीपासून बचावासाठी पशुधनाला थंड वातावरणातून अचानक उष्ण वातावरणात नेणे टाळावे. जनावरांना केवळ दिवसाच्या थंड वेळेत चरायला सोडावे तसेच उष्ण काळात सावलीत किंवा हवेशीर निवाऱ्यात ठेवावे. वाढत्या तापमानाशी जुळवून घेण्यासाठी पशुधनाला हळूहळू सवय लावणे आवश्यक आहे.

लहान वासरे, करडे, काळ्या किंवा गडद रंगाचे प्राणी, श्वसनाच्या आजाराने ग्रस्त जनावरे, वराह व दुभती जनावरे तसेच कुक्कुट पक्षी यांना उष्माघाताचा विशेष धोका असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. उष्माघाताची लक्षणे ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामध्ये धाप लागणे, श्वासाचा वेग वाढणे, पाणी जास्त प्रमाणात पिणे, चारा कमी खाणे, सुस्ती येणे, लाळ गाळणे, नाकपुड्या कोरड्या पडणे व शरीरातील पाणी-क्षारांचे प्रमाण कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात. अशी लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करून घ्यावेत, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. तुषार बावणे यांनी केले आहे.

## उष्णतेच्या लाटांमध्ये वाढ; IITM-आरबीआय करार

नवी दिल्ली (दै. संध्या) :

गत 51 वर्षांत देशात तब्बल 706 उष्णतेच्या लाटा आल्या. 1970 पर्यंत वर्षात सरासरी फक्त तीन उष्णतेच्या लाटा तयार होत होत्या. मात्र, गत 20 वर्षांपासून एका वर्षात तब्बल 25 उष्ण लाटांचा सामना करण्याची वेळ आली आहे. यंदाचा उन्हाळा कडक असून, पारा 45 अंशांवर पोहोचण्याचा अंदाज हवामानतज्ज्ञांनी वर्तविला आहे. हा विषय अर्थकारणाशी निगडित असल्याने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) प्रथमच पुण्यातील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी (आयआयटीएम) समवेत करार केला आहे.

# न्यायमूर्ती शर्मा यांचा सुनावणीतून हटण्यास नकार

## दिल्ली मद्य धोरण घोटाळा: अरविंद केजरीवाल यांची मागणी फेटाळली

नवी दिल्ली (दै. संध्या) :

दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी आज एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी या प्रकरणाच्या सुनावणीतून न्यायमूर्तींनी स्वतःला बाजूला करावे (Recusal), अशी मागणी केली होती. मात्र, न्यायमूर्ती शर्मा यांनी ही मागणी फेटाळून लावत या प्रकरणाची सुनावणी स्वतःच करणार असल्याचे स्पष्ट केले.




### न्यायालयाची महत्त्वाची निरीक्षणे

न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी आपला निर्णय सुनावताना अत्यंत परखड मते मांडली:

सोपा मार्ग निवडला नाही: न्यायमूर्ती म्हणाल्या, "माझ्यासाठी सर्वात सोपा मार्ग हा असता की, कोणतीही सुनावणी न घेता मी या प्रकरणातून बाजूला झाले असते. परंतु, न्यायाधीशाने कोणत्याही दबावाखाली न येता आपले कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे."

दबावाशिवाय निर्णय: त्यांनी स्पष्ट केले की, त्या या प्रकरणाचा निकाल कोणत्याही बाह्य प्रभावाशिवाय किंवा दबावाशिवाय केवळ गुणवत्तेच्या आधारावर देतील.

कर्तव्याला प्राधान्य: न्यायाधीशांवर अशा प्रकारे संशय व्यक्त करून त्यांना सुनावणीपासून रोखण्याच्या प्रवृत्तीवर त्यांनी अप्रत्यक्षपणे नाराजी व्यक्त केली.

### काय आहे प्रकरण?

दिल्ली मद्य धोरण प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ED) केलेल्या कारवाईला आणि अटकेला केजरीवाल यांनी आव्हान दिले आहे. यापूर्वीही अनेकदा या प्रकरणातील जामीन आणि इतर याचिकांवर न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली आहे. केजरीवाल यांच्या वकिलांनी काही तांत्रिक आणि निष्पक्षतेच्या कारणास्तव न्यायमूर्तींनी हे प्रकरण ऐकू नये, अशी विनंती अर्जाद्वारे केली होती.

न्यायमूर्तींच्या आजच्या निर्णयामुळे आता या प्रकरणाची पुढील सुनावणी त्यांच्याच खंडपीठासमोर सुरू राहील. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे 'बेंच हंटिंग' (आपल्याला हवे ते न्यायाधीश निवडणे) च्या प्रयत्नांना चाप बसल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

### केजरीवाल तामिळनाडू निवडणूक प्रचारात व्यस्त

हा न्यायालयीन घटनाक्रम अशा वेळी घडत आहे जेव्हा अरविंद केजरीवाल राजकीयदृष्ट्या अत्यंत सक्रिय आहेत. सध्या तामिळनाडू विधानसभा निवडणूक २०२६ चे वारे वाहत असून, केजरीवाल तिथे 'इंडिया' (INDIA) आघाडीच्या प्रचारासाठी पोहोचले आहेत.

### स्टालिन यांच्यासोबत प्रचार:


मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांच्या खांद्याला खांदा लावून निवडणूक प्रचार करत आहेत. दिल्लीतील कायदेशीर लढाई सुरू असतानाच, दक्षिणेतील राजकारणात आपला प्रभाव पाडण्यासाठी केजरीवाल यांनी तामिळनाडूच्या दौऱ्यावर भर दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मानव एकता दिवस: सेवा आणि आध्यात्मिक समरसतेचा एक पावन उत्सव

पिंपरी (दैनिक संध्या) : जेव्हा मानवाच्या हृदयात प्रेमाची मधुर आणि अखंड धारा प्रवाहित होते आणि आत्मा एकत्वाच्या दिव्य स्पंदनाने उजळून निघतो, तेव्हाच मानवतेचे खरे आणि पवित्र स्वरूप प्रकट होते. हीच ती अवस्था आहे जिथे सर्व भेदभाव आपोआप नाहीसे होतात आणि करुणा, समरसता तसेच सार्वभौम बंधुभावाची भावना जिवंत होते. याच दिव्य आध्यात्मिक चेतनेला साकार करण्यासाठी संत निरंकारी मिशनतर्फे बाबा गुरबचन सिंह जी यांच्या पावन स्मृतीनिमित्त 'मानव एकता दिवस' २४ एप्रिल २०२६ रोजी श्रद्धा, समर्पण आणि प्रेममय वातावरणात आयोजित केला जाणार आहे, जो संपूर्ण मानवजातीला एकत्व, सेवा आणि सद्भाव यांचा अमूल्य संदेश देईल. सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन आशीर्वादाने पुण्यातील विविध सत्संग भवनांमध्ये भव्य आणि दिव्य सत्संगाचे आयोजन करण्यात येईल, जिथे श्रद्धाळू भक्त प्रेम, भक्ती आणि आध्यात्मिकतेच्या अद्वितीय संगमाचा अनुभव घेतील. हा पावन प्रसंग केवळ एक आयोजन नसून, आत्मिक जागृतीचा उत्सव असेल, जो प्रत्येक हृदयाला ईश्वरीय एकत्वाच्या अनुभूतीशी जोडून आंतरिक शांती आणि समाधानाचा अनुभव करून देईल. यासोबतच, देश-विदेशातील विविध शाखांमध्येही श्रद्धाळू भक्त एकत्र येऊन या दिव्य सत्संगाला सखोल आत्मिक भावाने साकार करतील. या पावन संगमाच्या माध्यमातून प्रत्येक हृदय प्रेम, शांती आणि बंधुत्वाच्या प्रकाशाने उजळून निघेल तसेच मानवतेच्या एकात्मतेचा संदेश जगभर प्रसारित होईल. या मानव एकता दिवसानिमित्त पुण्यामध्ये संत निरंकारी सत्संग भवन विजयनगर, काळेवाडी त्याचबरोबर संत निरंकारी सत्संग भवन, फॉरेस्ट पार्क, चंदननगर येथे एकाच दिवशी सकाळी ८ वाजेपासून दुपारी ५ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर अत्यंत श्रद्धा, समर्पण आणि सेवा-भावाने आयोजित करण्यात आले आहे. या पावन सेवा यज्ञात वाय. सी.एम.रुग्णालय, ससून रुग्णालय, संत निरंकारी रक्तपेढीचे अनुभवी डॉक्टरांचे समर्पित पथक आपल्या कौशल्य आणि करुणेने सेवा प्रदान करतील, ज्यामुळे हा उपक्रम मानवतेप्रती संवेदनशीलतेचे एक जिवंत उदाहरण ठरेल. हा पावन दिवस बाबा गुरबचन सिंह जी आणि चाचा प्रताप सिंह जी यांच्या दिव्य स्मृतीला समर्पित आहे, ज्यांचे संपूर्ण जीवन त्याग, समर्पण आणि निःस्वार्थ सेवेचे एक अद्वितीय उदाहरण राहिले आहे. त्यांनी आपल्या आचरणातून आणि विचारांतून मानवतेला प्रेम, नम्रता आणि परोपकाराचा खरा मार्ग दाखवला. त्यांचे दिव्य आदर्श आजही प्रत्येक हृदयात सेवा, भक्ती आणि एकत्वाचा प्रकाश प्रज्वलित करतात आणि संपूर्ण मानवजातीला ही प्रेरणा देतात की, खरी साधना केवळ शब्दांत नसून निस्वार्थ सेवा, करुणा आणि परस्पर बंधुभावामध्ये सामावलेली आहे.



### मुळशीतील माण गावच्या यात्रेत गोळीबार; दहशत निर्माण, एकाला अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : मुळशी तालुक्यातील माण गावातील यात्रेत किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाने हवेत तीन राउंड फायर करत दहशत निर्माण केली. ही घटना रविवार (दि. 19) रोजी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास भोईरवाडी येथे घडली. पोलिसांनी या प्रकरणी एका तरुणाला अटक केली आहे. मयूर काळुराम भोईर, असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्यासह तानाजी हनुमंत काखनाळे, दत्तात्रय गुलाब भोईर, पांडुरंग गुलाब भोईर (सर्व रा. भोईरवाडी, माण, ता. मुळशी) आणि इतर दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी तुकाराम नाथू भोईर (55, रा. भोईरवाडी, माण, ता. मुळशी) यांनी हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुळशी तालुक्यातील माण गावची यात्रा सुरू होती. रविवारी गावात यात्रेनिमित्त तमाशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रात्री नऊ वाजताच्या सुमारास भोईरवाडी येथील दत्त मंदिरासमोर तमाशाचा कार्यक्रम सुरू असताना तानाजी काखनाळे हा स्टेजजवळ उभा राहून नाचत धिंगाणा घालत होता. त्यामुळे गावचे माजी पोलिस पाटील असलेले फिर्यादी तुकाराम भोईर त्याला समजावून सांगण्यासाठी गेले. या वेळी तानाजी काखनाळे याने तुकाराम भोईर यांना शिवीगाळ करून मारहाण केली आणि तेथून निघून गेला. त्यानंतर रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास तुकाराम भोईर व त्यांचे नातेवाईक घरी जात असताना तानाजी राहत असलेल्या इमारतीजवळ आले. त्यांनी तानाजीचा घरमालक दत्तात्रय भोईर यांना घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. मात्र दत्तात्रय भोईर यांनी तानाजीला समजावून सांगण्याऐवजी फिर्यादींसोबतच वाद घालत भांडणास सुरुवात केली. या वेळी दत्तात्रय भोईर व तुकाराम भोईर यांच्या गटांमध्ये जोरदार धक्काबुक्की व मारामारी सुरू झाली. परिस्थिती चिघळत असताना दत्तात्रय भोईर याच्यासोबत असलेल्या मयूर भोईर याने त्याच्याकडील पिस्तूल काढून हवेत तीन राउंड फायर केले. पिस्तुलाच्या धाकाने तुकाराम भोईर व त्यांच्या सोबत असलेले लोक घाबरून तेथून निघून गेले. घटनेची माहिती मिळताच हिंजवडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मयूर भोईर याला ताब्यात घेऊन अटक केली असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. हिंजवडी पोलिस तपास करीत आहेत.

### पिंपरीत अवजड वाहनांवर कारवाई; नियमभंगासाठी 3 कोटींचा दंड वसूल

पिंपरी (दैनिक संध्या) : शहरात अवजड वाहनांच्या नियमबाह्य प्रवेशामुळे बऱ्याचदा वाहतूककोंडी तसेच अपघातांच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. याबाबीचा विचार करून वाहतूक विभागाने नियम मोडणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. अशा वाहनचालकांकडून 3 कोटीहून अधिक दंड आकारण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाने शहरात अवजड वाहनांच्या प्रवेशावर ठराविक वेळेत बंदी घातली आहे. सकाळी 8 ते दुपारी 12 आणि सायंकाळी 4 ते रात्री 9 या वेळेत अवजड वाहनांना शहरात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. वाहतूक विभागाच्या आकडेवारीनुसार, नियमभंग करणाऱ्या अवजड वाहनचालकांकडून तब्बल 3 कोटी 2 लाख 98 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# पीएमआरडीएचा स्ट्रक्चरल प्लॅनसाठी हट्ट कशासाठी - भसे

## एमपीसी मधील २३ रिक्त जागा ताबडतोब भरा

पिंपरी (दै. संध्या)

पीएमआरडीए ने कोट्यावधी रुपये खर्च करून तयार केलेला व नंतर रद्द केलेला बेकायदेशीर प्रारूप विकास आराखड्यामधील झालेल्या चुका दुरुस्त करून घ्याव्यात. हे कमी खर्चात आणि कमी वेळेत होऊ शकते मात्र तसे न करता प्रशासनाचा हट्ट स्ट्रक्चरल प्लॅनसाठी का आहे असा प्रश्न पुणे महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंत भसे यांनी उपस्थित केला.



तसेच सध्या अस्तित्वात असणाऱ्या महानगर नियोजन समितीमध्ये (एमपीसी) अद्यापही २३ जागा रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या असून त्यातून रिक्त असणाऱ्या २३ जागा भराव्यात आणि पुढील काळात एमपीसी च्या अधिकारातच सर्व विकास योजना राबवण्यात व घटनेने दिलेल्या एमपीसी च्या अधिकारांची अंमलबजावणी करावी अशी ही मागणी यावेळी भसे यांनी केली.

सोमवारी (दि. २०) पिंपरी ते आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत भसे बोलत होते. यावेळी ॲड. उमेश तारे, जमीन हक्क परिषद पुणे जिल्हा अध्यक्ष सुभाष धामणकर, तळेगाव दाभाडे माजी नगराध्यक्ष कृष्णाजी काटके, बाधित शेतकरी बाबासाहेब बुचुडे आदी उपस्थित होते.

यावेळी वसंत भसे यांनी सांगितले की, महानगर नियोजन समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री आहेत. अगोदर केलेला प्रारूप विकास आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केल्याची जाहीरपणे घोषणा करून तसे आदेश दिलेले आहेत. परंतु प्रशासन मात्र त्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत आहे. नगर विकास खात्यातील काही अधिकारी आपल्या मर्जीने काम करीत आहेत. २०१३ मध्ये दहा किलोमीटर क्षेत्राचा विकास आराखडा केलेला असताना ती माहिती मुख्यमंत्र्यांपासून दडवून ठेवून स्ट्रक्चरल प्लॅनचा आग्रह अधिकारी कशासाठी करत आहेत. या स्ट्रक्चरल प्लॅन मुळे बाधित शेतकऱ्यांच्या जागा रस्त्यासाठी घेऊन त्यांना मोबदला अथवा परतावा कसा देणार याचे स्पष्ट धोरण नाही.

त्यामुळे लाखो शेतकरी विस्थापित होऊन देशोधडीला लागतील, शेतकरी भूमिहीन होऊन उद्योजक आणि बिल्डरांचे खिसे भरले जातील. हा सर्वसामान्य शेतकऱ्यांचा आवाज उठवण्यासाठी वेळोवेळी कमिटीच्या वतीने पत्रव्यवहार करून देखील प्रशासनाचे डोळे उघडत नाहीत, म्हणून पुन्हा मा. उच्च न्यायालयात जावे लागले आहे असे भसे यांनी सांगितले.

# शासनाच्या परिपत्रकाने संभ्रम दूर; अडकलेले व्यवहार मार्गी

## नोंदणी प्रक्रिया सुलभ; नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाने याबाबत परिपत्रक काढले

पिंपरी (दै. संध्या)

संरक्षण विभागाच्या प्रतिबंधित (रेड झोन) क्षेत्रातील मालमत्तांच्या खरेदी-विक्री व्यवहारांवरील संभ्रम अखेर दूर झाला आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड व पुणे शहरासह परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाने याबाबत परिपत्रक काढले आहे. आता रेड झोनमधील मालमत्ता खरेदी-विक्रीचा मार्ग मोकळा झाला आहे. या परिपत्रकात अशा व्यवहारांना स्पष्ट परवानगी देण्यात आली आहे.



नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने 9 एप्रिल 2026 ला काढलेल्या या परिपत्रकात, भारतीय संरक्षण कार्ये अधिनियम, 1903 च्या कलम 7 अंतर्गत रेड झोनमध्ये बांधकाम, दुरुस्ती व विकासकामांवर निर्बंध असल्याचे नमूद केले आहे. परंतु, मालमत्तेच्या खरेदी-विक्री व्यवहारांवर कोणतीही बंदी नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार, रेड झोनमधील मोकळ्या जागांच्या खरेदी-विक्रीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नसेल.

ज्या बांधकामांना पूर्वीच सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता मिळालेली आहे, अशा मालमत्तांच्या हस्तांतरणासाठी किंवा पुनर्विक्रीसाठी पुन्हा परवानगी घेण्याची गरज नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. शहरातील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर रेड झोन क्षेत्र येत असल्याने येथे अनेक वर्षांपासून मालमत्ता व्यवहार अडकून पडले होते. दस्त नोंदणी कार्यालयांकडून अशा व्यवहारांची नोंदणी टाळली जात असल्याने अडचणींना सामोरे जावे लागत होते. या नियमामुळे रेड झोन भागांतील मात्तमत्ता खरेदी-विक्री व्यवहारासंदर्भातील दुय्यम निबंधकांकडील संदिग्धता दूर झाली आहे. दस्त नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होणार आहे. मोकळ्या जमिनीच्या व्यवहारांसाठी परवानगीची अट रद्द झाली आहे. मंजूर बांधकामांच्या पुनर्विक्रीसाठी नव्याने मंजुरीची गरज असणार नाही.

देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून 2 हजार यार्ड (1.82 किलोमीटर) परिघात तळवडे, चिखली, रुपीनगर, त्रिवेणीनगर, निगडी, यमुनानगर, देहूरोड आदी परिसर रेड झोन क्षेत्रात येतो. तर, दिघी मॅझझिन डेपोपासून 1 हजार 145 मीटर रेड झोन हद्द आहे. त्या रेड झोन हद्दीत दिघी, चऱ्होली, बोपखेल, भोसरी, चक्रपाणी वसाहत आदी भाग येतो.

रेड झोनमधील अडकलेले मालमत्ता खरेदी-विक्री व्यवहार मार्गी लागणार आहेत. शहरातील सुमारे एक लाख नागरिकांना थेट दिलासा मिळणार आहे. घर, बंगलो, सदनिका, गाळे, जागा खरेदी व विक्रीचा अडथळा दूर होणार आहे. मालमत्ता बाजारात पुन्हा व्यवहारांना गती मिळणार आहे.

या परिपत्रकामुळे दुय्यम निबंधक कार्यालयातील मनमानीला आळा बसणार असून, नागरिकांना दिलासा मिळेल. या व्यवहारांमधून शासनाच्या मुद्रांक शुल्कातही वाढ होणार आहे. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील रेड झोनमधील मालमत्ता व्यवहारांना चालना मिळणार आहे.

# पिंपरीत परमिटपेक्षा जास्त रिक्षांची नोंदणी

पिंपरी (दै. संध्या)

औद्योगिकनगरी म्हणून पिंपरी चिंचवड शहराची ओळख आहे. मात्र, अनियंत्रित वाढीमुळे शहर वाहतूक कोंडीच्या जाळ्यात अडकले आहे. कायद्यानुसार एका परमिटवर एकच ऑटो रिक्षा नोंदणी होऊ शकते. मात्र, पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात ऑटो परमिटपेक्षा जास्त रिक्षांची नोंदणी झाली आहे. शहरात 47 हजार 500 ऑटो परमिट वितरीत करण्यात आले असून, 48 हजार 150 रिक्षांची नोंदणी करण्यात आली आहे.

शहराच्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुविधेसाठी राज्य परिवहन विभागाकडून खासगी वाहतुकीसाठी रिक्षाला परमिट दिले जाते. मोटार व्हेईकल ॲक्टनुसार हे परवाने दिले जातात. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत रिक्षा कमी असल्याचे लक्षात आल्यानतंर आरटीओने 2017 मध्ये नवीन रिक्षांना परवाने देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे मागेल त्याला परमिट देण्यात येत होते. अगदी राज्यासह परराज्यातील अर्जदारांनी परमिट देण्याचा धडका सुरू केला. त्यामुळे अनेकांना व्यवसाय मिळाला तर, अनेकांनी रिक्षा घेऊन परवाने घेतले. त्यामुळे रिक्षांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्या.

पिंपरी-चिंचवड शहरात सध्या 47 हजार 500 परवाने दिले आहेत. शहरात रिक्षाची संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे. शहरातील रिक्षांची वाढती संख्या लक्षात येताच, विविध रिक्षा संघटनांनी परिवहन विभागाकडे ऑटो रिक्षा परमिट बंद करण्याची मागणी केली, परंतु ऑटो परमिटपेक्षा ऑटो रिक्षाची संख्या जास्त असल्याचे आरटीओकडून दिलेल्या आकडेवारीवरुन निदर्शनास येत आहे. तसेच, या आधी एका परमिटवर अनेक रिक्षांची नोंदणी झाल्याची बाब समोर आली आहे.

# पिंपरीत आरटीई प्रवेश कागदपत्र पडताळणीस मुदतवाढ

पिंपरी (दै. संध्या)

आरटीई प्रवेशासाठी कागदपत्र तपासणीसाठी सोमवार (दि. 20) अंतिम मुदत होती; मात्र दिलेल्या मुदतीमध्ये बहुतांश पालकांची कागदपत्र पडताळणी अपूर्ण राहिल्याने, प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून 30 एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सोमवार (दि. 20) कागदपत्र पडताळणीची अंतिम मुदत म्हणून आकुर्डीतील कै. वसंतदादा पाटील विद्यामंदिर याठिकाणी पालकांची गर्दी झाली होती. आरटीई प्रवेशाची लॉटरी 10 एप्रिल रोजी काढण्यात आली. त्यानंतर कागदपत्र तपासणीला सुरुवात झाली.

# पिंपरी आरटीओत दुचाकींसाठी 'एनएच' नवी मालिका

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी एनएच ही नवीन मालिका सुरू करण्यात येत आहे. नव्याने सुरू होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक हवे असल्यास तीनपट शुल्क भरून चारचाकी वाहनधारकांनी बुधवार (दि.




22) सकाळी 11 ते दुपारी अडीच वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात डीडी, पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'डी.वाय. आर.टी.ओ.', पिंपरी चिंचवड यांच्या नावे राष्ट्रीयीकृत, अनुसूचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्त्याच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. चारचाकी वाहनांसाठी क्रमांकांची यादी 23 एप्रिल रोजी सकाळी कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल.

# पिंपरीत स्वीकृत नगरसेवक निवड पुन्हा लांबणीवर

## सर्वसाधारण सभा तहकूब; इच्छुकांची धाकधूक वाढली, 5 मेच्या बैठकीकडे लक्ष

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकांची निवड सोमवारच्या (दि.20) सर्वसाधारण सभेत करण्यात येणार होती. मात्र, ती सभा तहकूब झाल्याने स्वीकृत नगरसेवकांची निवड पुन्हा लांबणीवर पडली आहे. परिणामी, इच्छुकांची धाकधूक आणखी वाढली आहे.



शेजारच्या पुणे महापालिकेत भाजपच्या स्वीकृत नगरसेवकांची यादी 9 मार्च 2026 ला जाहीर झाली. त्यानंतर सर्वसाधारण सभेत निवड प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपाच्या स्थानिक नेते व पदाधिकाऱ्यांमध्ये एकमत होत नसल्याने स्वीकृत नगरसेवकांचा तिढा अद्याप सुटलेला नाही. सात जागांसाठी तीनशेहून अधिक अर्ज इच्छुक असल्याने शहर भाजपाने स्वीकृत नगरसेवक निवडीचा निर्णय प्रदेश कमिटीवर सोपवला आहे. त्यात जुने विरुद्ध नवे, आमदार समर्थक विरुद्ध निष्ठावंत असा संघर्ष सुरू आहे.

दहा स्वीकृत नगरसेवकांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन जणांची नावे आजच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर होती. त्यात माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, माजी नगरसेविका सीमा सावळे, पक्षाचे पदाधिकारी फजल शेख यांचा समावेश आहे. या तीन नावाची निवड 4 मार्च 2026 ला झाली आहे. मात्र, त्यांच्या नावावर सर्वसाधारण सभेकडून अद्याप अधिकृत शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यांची निवड सत्ताधारी भाजपामुळे अडकून पडली आहे.

भाजपात आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे असे प्रमुख गट आहेत. त्यांनी आपल्या समर्थकांची नावे सुचवली आहेत. दुसरीकडे भाजपातील एका गटाने ज्येष्ठ व निष्ठावंत अशी काही नावे सुचवली आहेत. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीनेही काही नावे सुचवली आहेत. माजी नगरसेवक आणि पराभूत नगरसेवकही स्वीकृत नगरसेवक होण्यास तीव्र इच्छुक आहेत. त्यामुळे कोणती नावे घ्यायची आणि कोणती गाळायची याबाब एकमत होत नाही. भाजपाकडे इच्छुकांची संख्या अधिक असल्याने नेमके कोणाला संधी द्यायची यावरून एकमत होत नाही आहे. ती नावे प्रदेश कमिटीकडे पाठविण्यात आली आहेत. नावे अंतिम करण्याची प्रक्रिया लांबणीवर पडली आहे. स्वीकृत नगरसेवकांच्या सात नावावर भाजपाचे एकमत झाल्याचा दावा सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी केला होता. त्यामुळे आजच्या सभेत सात जणांची निवड होण्याची शक्यता होती. मात्र, ती सभाच तहबूक झाल्याने त्या निवडी पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. आता, 5 मे रोजीच्या तहकूब सभेकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

स्वीकृत नगरसेवकांची निवड 13 मार्च 2026 च्या सर्वसाधारण सभेत होणे अपेक्षित होते. मात्र, सत्ताधारी भाजपाचे सात नावे निश्चित होत नसल्याने त्या सभेत निवड न करता तो प्रस्ताव तहकूब करण्यात आला. त्यानंतर सोमवारच्या सभेतही ती निवड झाली नाही. सत्ताधाऱ्यांकडून स्वीकृत नगरसेवक निवडीचा विषय वारंवार लांबणीवर टाकला जात असल्याने स्वीकृत नगरसेवकांचा कालावधी वाया जात आहे. परिणामी, त्यांना कमी कार्यकाळ मिळणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, माजी नगरसेविका सीमा साळवे आणि पदाधिकारी फलज शेख अशी तीन जणांची नावे दिली आहे. ती नावे तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्वीकारली आहेत. त्यातील त्रासदायक ठरणाऱ्या एकाचे नाव वगळावे, असा प्रयत्न भाजपाच्या पदाधिकाऱ्यांकडून पडद्यामागे केला जात आहे. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना विनवण्या केल्या जात आहेत. त्याबाबत ठोस निर्णय किंवा तडजोड होईपर्यंत भाजपाची सात नाव जाहीर केली जाणार नाहीत, अशी माहिती सूत्रांनी दिली.

महापालिकेची शहरात एकूण आठ क्षेत्रीय कार्यालय आहेत. क्षेत्रीय कार्यालय अध्यक्षांची निवड केली जाते. त्यासाठी लवकरच निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. सत्ताधारी पक्षासह विरोधातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेनेकडून (एकनाथ शिंदे) अर्ज मागविण्यात येणार आहेत. त्या संदर्भातील प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे महापालिकेचे नगरसचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## पुरंदरच्या पूर्व भागातील भारनियमन रद्द करा; अन्यथा बेमुदत उपोषणाचा इशारा – यादव

पुणे (दैनिक संध्या) : पुरंदर : पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांमध्ये गेल्या दोन महिन्यांपासून सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत घरगुती वीजपुरवठ्यावर भारनियमन सुरू आहे. या चार तासांच्या वीजखंडिततेमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असून, तात्काळ भारनियमन रद्द करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात सासवड येथील महावितरण कार्यालयात जाऊन कार्यकारी अभियंता भालचंद्र गवई यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य माऊली यादव यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, येत्या १५ दिवसांत भारनियमन रद्द न केल्यास महावितरण कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल. माळशिरस, नायगाव, पोंढे, राजुरी, पिंपरी, मावडी सुपे, रिसे, पिसे, नाझरे, पिसर्वे, टेकवडी या गावांमध्ये सुरू असलेल्या भारनियमनामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत आहे. सध्या वाढत्या उन्हाळ्यामुळे नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत असून, अंधारामुळे परिसरात छोट्या-मोठ्या चोरीच्या घटनांमध्येही वाढ झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. या वेळी जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, अंकुश भगत, रोहिदास कड, संदीप देवकर, महेश राणे, बळीराम सोनवणे, अर्जुन पाटोळे यांच्यासह विविध गावांतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महावितरणचे कार्यकारी अभियंता गणेश चांदणे व सहाय्यक अभियंता जीवन ठोंबरे हेही उपस्थित होते. नागरिकांच्या वाढत्या समस्यांचा विचार करून भारनियमन तातडीने रद्द करावे, अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा ठाम इशारा माऊली यादव यांनी दिला आहे.

## हिवरे खुर्द शाळेत शिक्षकांचा कार्यगौरव

जुन्नर (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरे खुर्द येथे इयत्ता पहिलीचा शाळा प्रवेशोत्सव, इयत्ता सातवीचा सदिच्छा समारंभ व हिवरे खुर्द शाळेतून बदली झालेल्या शिक्षकांचा कार्यगौरव समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोहिदास जाधव होते. कार्यक्रम प्रसंगी अशोक लांडे साहेब, गटशिक्षणाधिकारी जुन्नर, विष्णू धोंडगे शिक्षण विस्तार अधिकारी, रविंद्र कुटे केंद्रप्रमुख, सरपंच मनेश बर्डे, उपसरपंच लक्ष्मण वायकर, शिक्षक नेते सत्यवान म्हस्के, न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक मच्छिंद्र भोर, सागर वायकर अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती, उपाध्यक्षा दिपाली जाधव, संतोष शिर्के, अन्वर शेख, वर्षा बर्डे , तारामती वायकर, शितल वाघचौरे, हिना शेख, हिवरे खुर्द गावातील अंगणवाडी सेविका अलका घोलप, सपना औटी, शैला येंधे, सुवर्णा बेनके वरील सर्व मान्यवरांचा सत्कार शालेय व्यवस्थापन समिती व शाळेच्या वतीने करण्यात आला. तसेच कार्यक्रम प्रसंगी ग्रामस्थ, पालक व गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. इयत्ता पहिलीचा शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. नवीन प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचा फेटा बांधून, शालेय वस्तू, गुलाबपुष्प व खाऊ देऊन साजरा करण्यात आला. तसेच इयत्ता सातवीचा सदिच्छा समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रम प्रसंगी आवनी येंधे, ईशिका वायकर, मानसी वायकर, ईश्वरी जाधव व जिकरा शेख या विद्यार्थीनींनी यांनी आपले शाळेविषयी व मार्गदर्शक शिक्षकांविषयी भावनिक मते व्यक्त केली. इयत्ता सातवी बॅचच्या वतीने शाळेस मुख्याध्यापक कार्यालयासाठी घड्याळ व शिक्षकांसाठी भेट वस्तू देण्यात आल्या. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरे खुर्द शाळेतून सुरेखा विजय नवले व सीमा चंद्रकांत जाधव या दोन्ही शिक्षिकांचा ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समिती, पालक, शिक्षक वृंद यांच्या वतीने सन्मानपत्र, शाल व गुलाबपुष्प देवून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. सुरेखा विजय नवले यांनी शाळेबद्दल भावनिक मनोगत व्यक्त केले. तसेच सीमा जाधव यांनी शाळेची वाढत चाललेली प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. तसेच इयत्ता चौथी व पाचवी चा एन.एस.एस.इ.च्या स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश मिळविल्याबद्दल विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक निलेश सरोदे यांचे मान्यवरांनी कौतुक केले. रोहिदास जाधव, लक्ष्मण वायकर, सागर वायकर, मच्छिंद्र भोर, सपना औटी व शिक्षक वृंद यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन विकास मटाले, सुरेखा म्हस्के, वर्षा जाधव यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अन्वर सय्यद मुख्याध्यापक, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश सरोदे यांनी केले व आभार गुणवंतराव इंगळे यांनी मानले.




## अनेकांत अविष्कार उपक्रमातील गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा गुणगौरव

पुणे (दैनिक संध्या) : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील कनिष्ठ विभागात आधुनिक तंत्रज्ञान - विकासाची नवी दिशा या संकल्पनेवर आधारित अनेकांत अविष्कार उपक्रमातील गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा गुणगौरव समारंभ मा. प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख पाहुणे डॉ.सचिन कुलकर्णी यांच्या शुभहस्ते दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी पार पडला. अनेकांत आविष्कार या उपक्रमात विविध स्पर्धेत जवळपास ४५० विद्यार्थी सहभागी झाले होते त्यातील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित ,जीवशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कम्प्युटर सायन्स, पर्यावरण शास्त्र ,कला शाखा व वाणिज्य शाखेतील, प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या प्रकल्पातील गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचा तसेच देशभक्तीपर गीत गायन , वक्तृत्व , निबंध , चित्रकला प्रश्नमंजुषा, रांगोळी, कराओके, मेहंदी, काव्यवाचन ,पुष्परचना, टाकाव पासुन टिकाऊ वस्तू बनवणे या स्पर्धात्मक उपक्रमातील विद्यार्थ्यांचा बक्षीस व कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कौतुक सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. गोरखनाथ मोरे, कला शाखेचे समन्वयक श्री .संजय शेंडे वाणिज्य शाखेचे समन्वयक श्री. रमेश गोसावी तसेच अनेकांत अविष्कार समिती प्रमुख सोनल ब्राह्मणकर व समिती सदस्य शिक्षक उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ.अश्विनी काकडे मॅडम तर सूत्रसंचालन श्री.बनकर सर यांनी केले

# स्वार्थाचा त्याग करून देशकार्यासाठी वेळ द्या-भेगडे

### चिखलीत प्रथमच भव्य दिव्य 'विराट हिंदू संमेलन' संपन्न!

--- (दै. संध्या)



चिखली (प्रतिनिधी) दिनांक २० एप्रिल २०२६:- हिंदू धर्म वाचवणे ही सर्वांची जबाबदारी आहे.धर्म म्हणजे ईश्वराच्या प्राप्तीचे सायन्स असून हिंदू राष्ट्रासाठी संघटित होण्याचे आवाहन प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेल्या कालीपुत्र कालिचरण महाराज यांनी हिंदू बांधवांना केले.नेवाळे वस्तीतील धर्मरक्षक भुजबळ प्रांगणात पार पडलेल्या विराट हिंदू संमेलनात ते (दि.१९) बोलत होते.या संमेलनाला चिखली आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील हरिपाठ व भजनी मंडळे, सर्व महिला बचत गट, सामाजिक संस्था, ज्येष्ठ नागरिक संघा सहित हजारो हिंदू बांधव, माता-भगिनी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कालिचरण महाराज म्हणाले की,भारताला 'हिंदू राष्ट्र' बनवणे ही काळाची गरज आहे. डाळ-तांदळाच्या भावासाठी रडणारी 'भिकारचोट' वृत्ती सोडली पाहिजे. हिंदूंनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन श्रीमंत व्हावे, तरच देश आणि धर्म श्रीमंत होईल."डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८० वर्षांपूर्वीच मुसलमानांच्या निष्ठेवर आणि शरीया कायद्यावर भाष्य केले होते. त्यांचे पुस्तक वाचून त्यांचा भक्त झालो आहे. मुसलमानांची पहिली निष्ठा त्यांच्या धर्माशी आणि जिथे इस्लामिक सत्ता आहे त्या देशाशी असते, हे आंबेडकरांचे विधान आजही तंतोतंत लागू पडते.आपल्याला अर्धेच वाक्य शिकवून नपुंसक बनवण्यात आले आहे.महाभारतातील पूर्ण श्लोक 'अहिंसा परमो धर्मः, धर्म हिंसा तथैव च' असा आहे.दुष्टांचा संहार करणे हाच खरा धर्म आहे. श्रीराम, श्रीकृष्ण आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शस्त्रास्त्रांचा दाखला देत त्यांनी हिंदू धर्माच्या शौर्याची आठवण करून दिली.

'लव्ह जिहाद', 'लँड जिहाद' आणि 'जिम जिहाद' यांसारख्या संकटांपासून सावध राहिले पाहिजे. तसेच, हलाल उत्पादनांवर बहिष्कार टाकून हिंदूंच्याच व्यापाराला प्राधान्य दिले पाहिजे.आपल्या मुलींच्या हातात स्वसंरक्षणासाठी शस्त्रे असावीत. भ्याड मृत्यू पत्करण्यापेक्षा धर्मासाठी योद्धा म्हणून मरा. जर मरायचेच असेल तर नथुराम गोडसे यांच्यासारखे देशद्रोह्याला मारून मरा, जेणेकरून लोक तुमचा उदो-उदो करतील. उपस्थित जनसमुदायाने 'जय श्री राम' आणि 'ओम काली'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला."जो धर्माचे रक्षण करतो, त्याचे रक्षण धर्म करतो," असे मत कालिचरण महाराजांनी व्यक्त केले.

सामाजिक पंच परिवर्तनावर बोलतांना अविनाश भेगडे म्हणाले की,"देशावर जेव्हा संकट येईल तेव्हा आपण आपली वैयक्तिक कारणे बाजूला ठेवून सक्रिय होणार का? उंदरांच्या गोष्टीप्रमाणे मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्याची जबाबदारी टाळून देश मोठा होणार नाही. प्रत्येकाने रोज देशासाठी थोडे तरी काम केले पाहिजे, तरच भारत बलशाली होईल.डॉ हेडगेवारांनी जात-पात विसरून सर्व हिंदूंना एकत्र आणण्यासाठी १९२५ मध्ये संघाची स्थापना केली. "संघाला कोणतेही श्रेय नको आहे. ज्या दिवशी हिंदू समाज स्वतःचे प्रश्न सोडवण्यास सक्षम होईल आणि सुसंघटित होईल, त्या दिवशी संघाचे कार्य पूर्ण होईल. 'ग्लोबलायझेशन'मुळे आपली कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त होत आहे. मोबाईलचे व्यसन सोडून आठवड्यातून एकदा तरी कुटुंबाने एकत्र बसून संवाद साधला पाहिजे आणि मुलांवर संस्कार केले पाहिजेत. पाण्याचा जपून वापर करणे, वृक्षारोपण करणे आणि 'सिंगल युज प्लास्टिक'चा त्याग करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन भेगडे यांनी केले.

## बालाजीनगर येथे शुक्रवारपासून अखंड हरिनाम सप्ताह

चाकण (दै. संध्या)

उद्योजक बप्पासाहेब जोगदंड व युवा नेते अरुण भाऊ कुसाळकर यांच्या संकल्पनेतून मेदनकरवाडी, बालाजीनगर (ता. खेड) येथे शुक्रवार (दि.२४ एप्रिल) ते शुक्रवार (दि.१ मे) या सलग आठ दिवसांच्या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सप्ताह कालावधीत पहाटे ४ ते ६ या वेळात काकडा आरती, सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, त्यानंतर ८ ते ११ या वेळात श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ३ ते ६ भजन, सायंकाळी ६ ते ७ या वेळात हरिपाठ होणार आहे. त्यानंतर रात्री ८ ते १० या वेळात किर्तनरुपी सेवा संपन्न होणार आहे. शुक्रवारी (दि. २४) ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पाणेगावकर यांची कीर्तन रुपी सेवा संपन्न होणार आहे. त्यानंतर अनुक्रमे ह.भ.प. गीतांजली झेंडे, वनिता पाटील, ॲड. शंकर महाराज शेवाळे, नेहाताई भोसले, प्रकाश महाराज बोधले, ज्योती धनाडे हे समाजप्रबोधन करणार आहेत. त्यानंतर हरिजागर होईल. चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रदेश संपर्कप्रमुख हभप. विनोद म्हाळुंगेकर, सरपंच अमोल साळवे, पोलीस निरीक्षक संजय सोळंके, संजय वाघमारे आदी कलश पूजन करणार आहेत.

राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सचिन मांजरे, उद्योजक निलेश जेधे, दिलीप इंगवले, लखीचंद कटारिया आदी विनापूजन व ज्ञानेश्वरी पूजन करणार आहेत. शुक्रवारी (दि.१ मे) सकाळी नऊ ते सकाळी ११ या वेळात समाजप्रबोधनकार ह.भ.प. नामदेव महाराज लबडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सोहळ्याची सांगता होणार आहे. पारायणाला बसणाऱ्या वाचकांना ज्ञानेश्वरी प्रत आयोजकांमार्फत मोफत दिली जाणार आहे. श्री खडग भवानी माता व मारुती राया यांच्या कृपाशीर्वादाने व ह.भ.प. शांतीब्रह्म गुरुवर्य मारुतीबाबा कुऱ्हेकर व ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले व ह.भ.प. हरिदासभाऊ जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली वरील नियोजित दिवशी बप्पासाहेब जोगदंड व अरुण कुसाळकर यांच्या संकल्पनेतून हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यंदा या सोहळ्याचे पाचवे वर्ष असून, या दिमाखदार सोहळ्याची यावर्षी जोरदार तयारी करण्यात आल्याची माहिती बप्पासाहेब जोगदंड, अरुणभाऊ कुसाळकर व रामभाऊ कुसाळकर यांनी दिली.

चाकण व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रवण सुखाबरोबर महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन सरपंच अमोल साळवे, रामभाऊ कुसाळकर, उत्तम कुसाळकर, सतीश विटकर, राजेश जोगदंड, तेजस जोगदंड आदींनी केले आहे.

## शेठ धनराजजी सांकला स्मृती व्याख्यानमालेची सांगता

चाकण (दै. संध्या)

रोटरी क्लबच्या वतीने चाकण येथे सलग पाच दिवस सुरू असलेल्या कै. शेठ धनराजजी सांकला स्मृती व्याख्यानमालेची मोठ्या उत्साहात सांगता करण्यात आली. नामांकित व अष्टपैलू वक्त्यांनी ही व्याख्यानमाला यंदा चांगलीच चाकण रोटरी क्लबच्या प्रांगणात सलग पाच दिवस ही व्याख्यानमाला सुरू होती. सुप्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला होता. " जीवन सुंदर आहे " या विषयवार त्यांनी मार्गदर्शन करून व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले. रोटरी ३१३१ चे जिल्हा प्रांतपाल मोहन पालेशा व उद्योजक अजित दानोले हे यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रसिद्ध प्रवचनकार व गप्पाष्टकार डॉ. संजय उपाध्ये यांनी " मन करा रे प्रसन्न " या विषयवार दुसरे, तर नामांकित प्रवचनकार प्रा. दिगंबर ढोकले यांनी " वन इन बिलियन " या विषयावर तिसरे पुष्प गुंफले. निवृत्त कमांडो श्रीकांत देशमुख यांनी " युद्धजन्य परिस्थिती आणि भारत " या विषयवार चौथे पुष्प गुंफले. सनदी अधिकारी दिपक म्हैसेकर यांनी " ढासळती कुटुंब पद्धती व नव्या पिढीमध्ये संस्काराचा अभाव " या विषयावर मार्गदर्शन करून अखेरचे पुष्प गुंफले.

## संगणक शिक्षण काळाची गरज - रामदास धनवटे

चाकण (दै. संध्या)

तंत्रज्ञानाच्या युगात संगणक शिक्षण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राजगुरुनगर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष रामदास धनवटे यांनी केले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी, कडाचीवाडी यांना टक्सी ऑटो कॉम चाकण यांच्या तर्फे तीन संगणक भेट देण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना धनवटे बोलत होते. धनवटे यांच्या विशेष सहकार्यातून आदिवासी ठाकर समाजातील शाळेस चांगल्या प्रतीचे तीन संगणक देण्यात आल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळणार आहे. विद्यार्थ्यांचा यातून सर्वांगीण विकास होण्यास नक्कीच मदत होणार आहे. " टक्सी ऑटो कॉम या कंपनीचे वरिष्ठ अधिकारी राजू सोनी यांनी शाळेतील विविध उपक्रम तसेच पुणे जिल्हा परिषदेचा नाविन्य पूर्ण उपक्रम म्हणजे स्कील लॅबची पाहणी केली. यामध्ये आरी वर्क सुतार काम प्लॅनिंग, रोबोटिक कोडिंग, इलेक्ट्रॉनिक, मेहंदी, रांगोळी, कराटे आदी विषयी विद्यार्थ्यांना मूलभूत प्रशिक्षण दिले जाते, याबद्दल शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी शिवसेनेचे खेड उपतालुका प्रमुख मंगेश पऱ्हाड, कडाचीवाडीचे माजी सरपंच महादेव बचुटे, किरण कड, पोलीस पाटील गणेश घोडके, रामभाऊ कड आदी उपस्थित होते.

## चाकण येथे शिक्षण संस्थेला पुस्तकांसह सार्थ ज्ञानेश्वरी प्रदान

चाकण (दै. संध्या)



स्व. गुलाबराव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या पुढाकारातून येथील स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेस तीनशे पुस्तकांसह दोनशे सार्थ ज्ञानेश्वरी प्रदान करण्यात आली.

विकास गोरे यांच्या पुढाकारातून शाळेतील विद्यार्थी व शाळेच्या ग्रंथालयासाठी ३०० पुस्तकं व शिक्षक, शिक्षिका आणि नागरिकांना सार्थ ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रदान करण्यात आले.

यावेळी संत ज्ञानेश्वर चरित्र समितीचे अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश काळे, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगांवकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, जिल्हा परिषद सदस्य ॲड विजयसिंह शिंदे, उद्योजक नितीन पाटील, नायब तहसीलदार संजय शिंदे, ह.भ.प. महादेव महाराज भुजबळ, उद्योजक राजेंद्र गोरे, अंकुश पवार, विष्णू गोरे, ॲड. किरण झिंजुरके, राजेंद्र दिक्षित, अशोक जाधव, नारायण करपे, राजेश जाधव आदी उपस्थित होते.

दत्तात्रय लिंभोरे यांनी सूत्रसंचालन केले. विकास गोरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# पुण्याचे प्रमुख लाइफस्टाइल आणि रिटेल डेस्टिनेशन

### मुलांसाठी आणि कुटुंबांसाठी खास तयार केलेला हा एक इमर्सिव्ह डायनासोर-थीम आधारित उपक्रम

पुणे (दै. संध्या)

कोरेगाव पार्कमधील पुण्याचे प्रमुख लाइफस्टाइल आणि रिटेल डेस्टिनेशन असलेले कोपा मॉल, 18 एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आपल्या समर ॲक्टिव्हेशन 'Jurassic Journey' च्या माध्यमातून भेट देणाऱ्यांना डायनासोरांच्या जगात घेऊन जाण्यास सज्ज आहे. हा एक अनोखा आणि अत्यंत इमर्सिव्ह अनुभव असून मनोरंजन आणि शिक्षण यांचा सुंदर संगम येथे पाहायला मिळतो. यामुळे मुलांना आणि कुटुंबांना एका प्रागैतिहासिक जगात प्रत्यक्ष प्रवेश केल्यासारखा अनुभव मिळतो, जो यापूर्वी कधीही अशा प्रकारे साकारलेला नाही.

संपूर्ण मॉलला एका जिवंत जुरासिक लँडस्केपमध्ये रूपांतरित करण्यात आले असून हा उपक्रम ओपन एरियाज आणि वॉकवेपर्यंत पसरलेला आहे, ज्यामुळे अखंड वॉक-थ्रू अनुभव मिळतो. वास्तवासारख्या डायनासोर इंस्टॉलेशन्स, थीमॅटिक झोन्स आणि इंटरॅक्टिव्ह स्टोरीटेलिंगमुळे 'Jurassic Journey' भेट देणाऱ्यांना काहीतरी अनोखे आणि आकर्षक अनुभवण्याचे कारण देते.


या उपक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे चार विशेष क्युरेटेड अनुभव झोन्स, जे कुतूहल वाढवण्यासाठी आणि प्रत्यक्ष शिकण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. येथे भेट देणारे विविध डायनासोर प्रजातींबद्दल माहिती आणि ट्रिव्हिया बोर्ड्सच्या माध्यमातून जाणून घेऊ शकतात. तसेच 'Dino Toss', AR आधारित 'DinoSnap' फोटो संधी आणि 'Feed the Dinosaur' सारखे इंटरॅक्टिव्ह अनुभव उपलब्ध आहेत.

या प्रवासात पुढे 'Meet Your Dino Match!' ट्रिव्हिया चॅलेंज, 'Jurassic Live Canvas (Draw Alive)' आणि 'Dino VR Zone' यांसारखे अनुभव डिजिटल आणि शैक्षणिक जगाचा संगम घडवतात. याशिवाय व्हिलेज-थीम झोनमध्ये 'Fossil Hunt', DIY आर्ट्स अँड क्राफ्ट्स, फॉसिल गॅलरी आणि 'Bones of the Beasts' स्केलेटल डिस्प्ले यांसारख्या उपक्रमांद्वारे पॅलिओन्टोलॉजी जिवंत केली जाते. 'VR Jurassic Safari' जीप फोटो बूथमुळे या अनुभवात साहसाचा रंग भरला जातो.

या अनुभवाला अधिक रोमांचक बनवण्यासाठी AR फोटो बूथ्स, 'Dig the Fossil', 'Feed the Dino' आणि 'Dino Toss' यांसारख्या अनेक ऊर्जादायी ॲक्टिव्हिटीजचा समावेश आहे. फॉसिल झोन्समध्ये क्रेन्स आणि एक्स्कॅव्हेटर्स ठेवून प्रत्यक्ष उत्खनन स्थळासारखे वातावरण तयार करण्यात आले आहे.

या संपूर्ण उपक्रमातील खास आकर्षण म्हणजे चालता-फिरता डायनासोर, जो मॉलमध्ये फिरत भेट देणाऱ्यांशी संवाद साधेल आणि मुलांना विविध अनुभव झोन्समध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करेल, ज्यामुळे आश्चर्य आणि आनंदाचा अतिरिक्त अनुभव मिळेल.

अभूतपूर्व स्केल आणि इमर्सिव्ह डिझाइनमुळे 'Jurassic Journey' या उन्हाळ्यात कोपा मॉलला एक आवर्जून भेट द्यावा असा डेस्टिनेशन बनवतो. हा केवळ एक कार्यक्रम नसून शोध, साहस आणि खेळ यांचा संगम असलेला संपूर्ण अनुभवात्मक परिसर आहे, जो भेट देणाऱ्यांना सहभागी होण्यासाठी, शोधण्यासाठी आणि अविस्मरणीय आठवणी निर्माण करण्यासाठी प्रेरित करतो.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### झी टीव्हीवरील 'तुम से तुम तक' या मालिकेत यश वर्धनच्या भूमिकेत अंगद हसिजाचा प्रवेश

मुंबई (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील 'तुम से तुम तक' ही मालिका आपल्या रोचक कथानकामुळे तसेच आर्य (शरद केळकर) आणि अनु (निहारिका चौक्सी) यांच्या प्रगल्भ होत जाणाऱ्या नात्याच्या प्रवासामुळे प्रेक्षकांची मने जिंकत असून आता ही मालिका एका महत्त्वाच्या व्यक्तिरेखेच्या प्रवेशामुळे कथानकात मोठे वळण आणण्यास सज्ज झाली आहे. ह्या कथेत नवीन रहस्य आणि उत्सुकता निर्माण करत अभिनेता अंगद हसिजा यश वर्धनच्या भूमिकेत प्रवेश करत आहे. यश वर्धनच्या प्रवेशामुळे कथेला रहस्य आणि अनुत्तरित प्रश्नांची छाया मिळते आणि मालिकेचा सूरच बदलतो. गायत्रीचा दुरावलेला मुलगा म्हणून त्याची ओळख करून दिली जाते आणि त्याचे अचानक परतणे दडपलेल्या भूतकाळाकडे इशारा करते, ज्यामुळे भावनिक घडामोडी आणि अनपेक्षित वळणे निर्माण होतात. त्याचे खरे हेतू आणि संपूर्ण कथा अजूनही गुप्त असली तरी त्याची उपस्थिती आसपासच्या लोकांच्या आयुष्यावर हळूहळू पण ठळक परिणाम करू लागते. त्याच्या स्वभावात एक शांत पण प्रभावी तीव्रता आहे, जी वेळोवेळी वाढत जाते आणि प्रत्येक संवादात उत्सुकता व तणाव निर्माण करते. कथा पुढे सरकत असताना यश वर्धन एक महत्त्वाची भूमिका बजावताना दिसणार असून लपलेली सत्ये उलगडत कथानकाला अधिक खोली देणार आहे आणि त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता कायम राहील. मालिकेत सहभागी झाल्याबद्दल बोलताना अंगद हसिजा म्हणाला, "'तुम से तुम तक' या मालिकेचा भाग होताना मला खूप आनंद होत आहे कारण ही मालिका प्रेक्षकांशी इतक्या घट्टपणे जोडली गेली आहे. यश वर्धन ही अनेक स्तर असलेली अतिशय रंजक व्यक्तिरेखा आहे आणि त्याच गोष्टीने मला लगेच आकर्षित केले. त्याचा प्रवास रहस्य आणि भावनिक खोलीने भरलेला आहे आणि कथा पुढे उलगडत जाताना या सर्व सूक्ष्म छटा साकारण्याची मला उत्सुकता आहे. आधीच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेल्या कथानकात प्रवेश करणे नेहमीच रोमांचक असते, आणि प्रेक्षकांनी हा नवा ट्विस्ट एन्जॉय करावा तसेच माझ्या पात्राशी जोडले जावे अशी आशा मी करतो." अंगद हसिजाच्या प्रवेशामुळे 'तुम से तुम तक' या मालिकेतील नाट्य आणखी रंगणार असून नवीन संघर्ष, धक्कादायक खुलासे आणि मोठे नाट्य प्रेक्षकांना खिळवून ठेवणार आहे.



### गुरु द्रोणाचार्य यांच्या भूमिकेत दिसणार अभिनेता जितेन लालवानी

मुंबई (दैनिक संध्या) : सोनी सब प्रेक्षकांना मोहून टाकण्यासाठी सज्ज आहे हस्तिनापुर के वीर या पौराणिक मालिकेसह, जी महाभारतातील सर्वात प्रतिष्ठित पात्रं पांडव आणि कौरव यांच्या बालपणातील प्रवासावर प्रकाश टाकते. शाश्वत मूल्ये आणि कालातीत शिकवणींवर आधारित ही कथा या दंतकथांच्या घडणीमागचा प्रवास जिवंत करते. या कथेला अधिक बळकटी देत आहे अनुभवी अभिनेता जितेन लालवानी, जो मालिकेत द्रोणाचार्यांची भूमिका साकारत आहे तो आदरणीय गुरु ज्यांच्या ज्ञानाने आणि मार्गदर्शनाने पांडव आणि कौरव घडले. जितेन त्यांच्या पौराणिक भूमिकांसाठी, दमदार स्क्रीन प्रेझेन्ससाठी आणि पात्रांना खोली देण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जातात. द्रोणाचार्य फक्त शिक्षक राहत नाहीत, तर मुलांना प्रेरणा देतात की ते आपल्या परिस्थितीपलीकडे जाऊ शकतात. पांडवांसाठी ते विचार घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, त्यांना शिकवतात की खरी किंमत कौशल्य, शिस्त आणि एकाग्रतेत आहे. ते सहजपणे प्रतिभा ओळखतात आणि काळजीपूर्वक ती वाढवतात, प्रत्येक मुलाला त्याच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी प्रोत्साहित करतात. त्यांच्या मार्गदर्शनातून ते दिशा, आत्मविश्वास आणि उद्देशाची जाणीव देतात, ज्यामुळे प्रत्येक मुलगा आपला प्रवास वेगळ्या नजरेतून पाहतो. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना जितेन लालवानी म्हणाले, "मला नेहमीच पौराणिक कथांशी एक खोल संबंध जाणवला आहे, आणि याआधी काही अशा भूमिकांचा भाग झाल्यामुळे मी अनुभवले आहे की ही पात्रं किती सामर्थ्यवान आणि कालातीत आहेत. पण द्रोणाचार्य वेगळे आहेत, ते शांत शक्ती आहेत जी पांडव आणि कौरवांच्या नियती घडवतात. आमच्या वर्कशॉप्सदरम्यान मला माझ्या स्वतःच्या प्रवासाची आणि मला मार्गदर्शन करणाऱ्या गुरूंची आठवण झाली. मला पौराणिक भूमिका साकारायला आवडते कारण त्यात नेहमीच अनेक स्तर असतात, आणि द्रोणाचार्यांच्या बाबतीत ते फक्त सामर्थ्याबद्दल नाही, तर जबाबदारी, निवडी आणि अंतर्गत संघर्षाबद्दल आहे. हाच या कथेला आणि या पात्राला माझ्यासाठी खास बनवतो." हस्तिनापुर के वीर मालिकेत प्रेक्षकांना महाभारताची एक नवी, भावनिक आणि आकर्षक मांडणी पाहायला मिळेल, जिथे कथा फक्त युद्धांपुरती मर्यादित राहत नाही, तर नातेसंबंध, मूल्ये आणि निवडी यांचा शोध घेते ज्यांनी या दंतकथांना आकार दिला.

### अर्जुन पुंज यांचे छोट्या पडद्यावर पुनरागमन

मुंबई (दैनिक संध्या) : सोनी सबवरील यादें जी आपल्या भावनिक कथानकामुळे प्रेक्षकांच्या मनात घर करून बसली आहे, आता एका नव्या रंगतदार वळणासह सज्ज होत आहे. अभिनेता अर्जुन पुंज याच्या पुनरागमनामुळे मालिकेत एक वेगळीच उर्जा आणि नॉस्टॅल्जियाची लहर येणार आहे. तब्बल दहा वर्षांहून अधिक काळानंतर अर्जुन पुंज छोट्या पडद्यावर परतत असून, त्याच्या पुनरागमनाने चाहत्यांमध्ये उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अर्जुन पुंज मालिकेत 'डिग्गी'ची भूमिका साकारणार आहे श्रीष्टी (गुलकी जोशी)चा प्रेमसाथी. ही व्यक्तिरेखा कथानकात एक वेगळीच ऊब आणि भावनिक खोली आणते. मनाने कलाकार असलेला डिग्गी छोट्या छोट्या क्षणांत सौंदर्य शोधतो आणि आयुष्याला नैसर्गिक, बिनधास्त पद्धतीने साजरे करतो. तो सहज, भावनाप्रधान आणि मनाने संवेदनशील आहे. नात्यांमध्ये तो प्रामाणिकपणे जगतो आणि मनापासून जोडतो. डॉ. देव, ही भूमिका इक्बाल खान यांनी साकारली गंभीर आणि शिस्तबद्ध व्यक्तिमत्त्वाच्या पूर्ण विरुद्ध, डिग्गीचा मुक्त आणि स्पॉन्टेनियस स्वभाव कथेला एक ताजेतवाने संतुलन देतो. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना अर्जुन पुंज म्हणाले, "इतक्या वर्षांनंतर पुन्हा टेलिव्हिजनवर परत येणं माझ्यासाठी खूपच रोमांचक आणि भावनिक आहे. 'यादें' आणि डिग्गी या व्यक्तिरेखेकडे मला आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे त्याचा खरा आणि बिनधास्त स्वभाव. तो सगळं काही बदलण्याचा किंवा पारंपरिक अर्थाने हिरो बनण्याचा प्रयत्न करत नाही; तो फक्त आपल्या प्रियजनांच्या सोबत उभा राहतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वात एक प्रामाणिकपणा आणि ऊब आहे, जी मला खूपच ताजीतवानी वाटली. डिग्गी छोट्या छोट्या गोष्टींमध्ये, लोकांमध्ये आणि क्षणांमध्ये सौंदर्य पाहतो ही गोष्ट मला वैयक्तिकरित्या खूप जवळची वाटते. प्रेक्षकांना डिग्गीची ओळख करून देण्यासाठी आणि या सुंदर प्रवासाचा भाग होण्यासाठी मी खूप उत्सुक आहे."

# विविध योजनांच्या एकत्रिकरणासाठी वॉर रूम स्थापन

मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे आज लोकार्पण करण्यात आले. यामध्ये राज्यामध्ये कार्यरत असणाऱ्या आरोग्यविषयक विविध योजनांचे एकत्रिकरण करण्यात येणार असून त्यासाठी प्रथमच राज्यात वॉर रूम स्थापन केली जाणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष केवळ आर्थिक मदतीचा स्रोत न राहता, रुग्ण, रुग्णालये आणि शासन यांना एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या कामकाजाचा आढावा व मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे उद्घाटन तसेच राज्यामध्ये कार्यरत आरोग्यविषयक योजनांचे एकत्रिकरण करण्यात येऊन वॉर रूम स्थापन करण्यासंदर्भात सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सादरीकरणाव्दारे नवीन ऑनलाईन प्रणालीची माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कर्करोगाच्या उपचारासाठी वापरली जाणारी इम्युनो थेरेपी अतिशय खर्चिक असते. तिचा खर्च सामान्यांच्या आवाक्याबाहेर असतो. या थेरेपीचे एक इंजेक्शन साधारणतः दोन लाख रुपयांच्या घरात असून, उपचाराचा एकूण खर्च जवळपास आठ लाख रुपये असतो. या उपचार पद्धतीचा लाभ राज्यातील गरजू रुग्णांना देण्यासाठी नियोजन करावे. आरोग्य योजनाचा लाभ गरजूना मिळावा, परंतु दुहेरी लाभ टाळल्यास त्याचा लाभ खऱ्या गरजुना जास्त प्रमाणात देता येईल. हा उपक्रम चांगला असून याद्वारे खऱ्या गरजुना मदत करता येईल, त्याचप्रमाणे दुहेरी लाभ देण्याचे प्रकारही टाळता येतील.

अर्ज स्थितीची ट्रॅकिंगः यापुढे रूग्णांना अर्जाची माहिती त्यांच्या मोबाईलवर एसएमएस, लिंकद्वारे रिअल टाईम मिळणार. टप्प्या-टप्प्याने निधी वितरणः अर्जाच्या मंजुरीनंतर ३० टक्के रक्कम तात्काळ, उर्वरित ७० टक्के रक्कम अंतिम मंजुरीनंतर




वर्ग केली जाणार. रिअल-टाइम वॉर रूम मॉनिटरिंग : मंत्रालय स्तरावर वॉर रूमद्वारे सतत देखरेख, निर्णय प्रक्रियेत गती.

तात्काळ मंजुरी (कार्यालयीन आठ तासांत मंजुरी) : उपचारासाठी लागणाऱ्या आर्थिक सहाय्याची मंजुरी केवळ कार्यालयीन आठ तासांत दिली जाते. पूर्णपणे पेपरलेस प्रक्रिया : कागदपत्रांची देवाणघेवाण किंवा कार्यालयीन धावपळीशिवाय डिजिटल पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण. रुग्णालयामार्फत थेट ऑनलाईन अर्जः रुग्णांना स्वतः अर्ज करण्याची गरज नाही रुग्णालयातूनच अर्ज सादर. कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी : आधार, उत्पन्न प्रमाणपत्र, शिधापत्रिका इ. तात्काळ डिजिटल पडताळणी.

थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी): मंजूर निधी थेट रुग्णालयाच्या खात्यात जमा पारदर्शकता वाढणार.

३ हजारापेक्षा अधिक रुग्णालयांचे जाळे : राज्यातील सरकारी व खाजगी मिळून ३,०००+ रुग्णालयांचा समावेश. हेल्पलाईन व डिजिटल मार्गदर्शन : टोल-फ्री १८०० १२३ २२११ व वाट्अॅप द्वारे मार्गदर्शन. मोबाईल अॅपद्वारे रुग्णालय शोधता येणार : योजनेमधील जवळील रुग्णालय, रक्तपेढी, रुग्णवाहिका सहज शोधण्याची सुविधा. एनजीओ व सीएसआर भागीदारी मॉडेलः स्वयंसेवी संस्था व कॉर्पोरेट सीएसआर निधीद्वारे अधिक आर्थिक सहाय्य उपलब्ध. त्रिपक्षीय करार प्रणाली : रुग्णालय + सीएसआर संस्था + सीएमआरएफ यांच्यात विशिष्ट आजारासाठी करार खर्चाचा संयुक्त भार. बेड मॅनेजमेंट व संसाधन पारदर्शकता : * धर्मादाय रुग्णालयांतील बेड उपलब्धता रिअल-टाइम पाहण्याची सुविधा.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी मुख्यमंत्री आरोग्य शिबिर व्यवस्थापन ऑनलाईन प्रणालीमध्ये आरोग्य शिबिरे घेतली जातात असे सांगितले. मुख्यमंत्री आरोग्य शिबिरामधील हृदय उपचाराशी संबंधीत 'स्टेमि ईसीजी' या वैद्यकीय तपासणीला 'मुख्यमंत्री हृदय संजीवनी' असे नाव देण्यात यावे असे सुचविले.

रुग्णांना तात्काळ आणि सुलभ मार्गदर्शन मिळावे यासाठी 'रुग्ण मित्र' ही २४x७ टोल-फ्री हेल्पलाईन (१८०० १२३ २२११) सुरू करण्यात आली आहे. या सेवेद्वारे रुग्णांना डिजिटल लिंक मिळते, ज्यातून त्यांच्या परिसरातील मान्यताप्राप्त रुग्णालये, रुग्णवाहिका सेवा आणि रक्तपेढ्यांची माहिती एका ठिकाणी उपलब्ध होते. त्यामुळे उपचारासाठी आवश्यक माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद झाली आहे.

लोकसहभाग वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांसाठी स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून संस्था नोंदणी करून शासनासोबत भागीदारी करू शकतात. तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) संस्था आणि रुग्णालय यांच्यातील त्रिपक्षीय करारामुळे महागड्या उपचारांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अधिक सक्षम झाली आहे. विशेषतः कर्करोगासारख्या गंभीर आजारांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा देणारा ठरत आहे.

यावेळी बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे,मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे,सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, डॉ.निपुण विनायक, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव - २ ई रविंद्रन, महिला व बालविकास सचिव अनुप कुमार यादव, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त अनिल भंडारी, धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी उपस्थित होते.

# वादळी पाऊस, गारपीट व विजांचा इशारा


## नागरिकांनी सतर्क राहण्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने आवाहन

मुंबई (दै. संध्या)

भारतीय हवामान खात्याच्या (आयएमडी) दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी जाहीर केलेल्या पाच दिवसीय अंदाजानुसार, राज्यातील विविध भागांत २० ते २४ एप्रिल या कालावधीत वादळी वारे, विजांचा कडकडाट, गारपीट आणि पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागातील जिल्ह्यांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांसाठी सूचना :




विजेचा कडकडाट ऐकू आला किंवा विज चमकताना दिसताच तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, मोकळ्या शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करू नये. निवाऱ्यापासून दूर असल्यास जमिनीवर आडवे न पडता पाय एकत्र करून खाली बसून राहावे.

प्रशासनासाठी उपाययोजना :

ग्रामपंचायत, पोलीस व आरोग्य विभागांनी तातडीने जनजागृती करावी. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके सज्ज ठेवावीत. शाळा, सभागृह व सार्वजनिक इमारती सुरक्षित निवाऱ्यासाठी खुल्या ठेवाव्यात. हवामान खात्याचे अद्ययावत इशारे गावपातळीपर्यंत त्वरित पोहोचवावेत.

शेतकरी बांधवांनी विजांच्या इशाऱ्याच्या कालावधीत शेतातील कामे टाळावीत. बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे. तसेच यात्रा, धार्मिक कार्यक्रम आणि मोठ्या प्रमाणावरील गर्दीचे आयोजन तातडीने स्थगित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने सर्व संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# सिंधुदुर्गच्या बंद मंदिरांचे दरवाजे उघडले!

मुंबई (दै. संध्या)

दशकानुदशकांचे अंतर्गत मतभेद, मानकऱ्यांमधील समन्वयाचा अभाव यामुळे कुलूपबंद असलेली सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मंदिरे पुन्हा उघडली असून तिथे चैतन्याचा घंटानाद घुमू लागला आहे, अशी माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाने मुंबईत खास पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र मंदिर महासंघाचे संजय जोशी यांनी सांगितले की, महासंघाने राबवलेले नामसत्संग, माणगावमधील जिल्हास्तरीय मंदिर परिषद आणि प्रत्यक्ष संवाद या त्रिसूत्रीमुळे घारपीचे बंद मंदिर उघडले, माडखोलमधील विखुरलेले मानकरी एकत्र आले तर पडवे, ओसरगाव आणि उगाडे येथील देवस्थानांनी धर्मरक्षणाची कास धरली. 'मंदिरे ही धर्माची आधारशिला आहेत. सिंधुदुर्गात घडलेला हा बदल केवळ मंदिरांचे दरवाजे उघडणे नसून ती हिंदू समाजाच्या संघटित होण्याचे लक्षण आहे, असही जोशी यांनी यावेळी सांगितले. सिंधुदुर्गनगरीतही पत्रकार परिषद घेत सनातन संस्थेच्या प्रतिनिधींनी याची सविस्तर माहिती दिली.

यावेळी धर्मप्रचारक सदगुरू सत्यवान कदम, मंदिर महासंघाचे शरद राऊळ, यशवंत परब, हिंदु जनजागृती समितीचे राजेंद्र पाटील, मंदिराचे मानकरी लिंग माऊली देवस्थान ओसरगावचे सर्वश्री घनश्याम राणे, देव रवळनाथ मंदिर पडवे ता. मालवणचे गोविंद रामचंद्र परब, माऊली मंदिर, घारपी येथील शिवराम गावडे, दीपक गावडे, विलास गावडे, श्री पावणाई रवळनाथ मंदिर, माडखोलचे दत्ताराम राऊळ, ग्रामपुरोहित जनार्दन भागवत, श्री भावई मंदिर कुणकेरीचे सुनील राऊळ, मंदिर महासंघाचे जीवन केसरकर सुनिल परब, घनश्याम राणे, रामचंद्र चव्हाण हे उपस्थित होते.

# कोल्हापूर येथील नियोजित फिश मार्केटला आवश्यक मदत व निधी

मुंबई (दै. संध्या)

कोल्हापूर शहरातील राजोपाध्ये नगर येथे होणाऱ्या नियोजित फिश मार्केटला आवश्यक मदत व निधी उपलब्ध करून दिला जाईल. फिश मार्केट इमारत उभारण्यासाठी आवश्यक प्रकिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिले. मंत्रालयात मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या. अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस आमदार अमल महाडिक, आयुक्त प्रेरणा देशभ्रतार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले, कोल्हापूर येथील नियोजित फिश मार्केट दर्जेदार व्हावे यासाठी जिल्हा नियोजनमधूनही निधी उपलब्ध करुन घ्यावा. या मार्केटसाठी मत्स्य व्यवसाय विभागाकडील अन्य योजनांचाही लाभ मिळवून दिला जाईल.

प्रस्तावित मार्केटमध्ये स्वच्छता, कोल्ड स्टोरेज, पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्थापन आणि ग्राहकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्‌घाटन

अहिल्यानगर (दै. संध्या)

महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्‌घाटन माननीय श्री. संग्राम जगताप (महाराष्ट्र विधानसभेचे आमदार) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अहिल्यानगर




परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे. उद्‌घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल. अपॉइंटमेंट साठी कृपया ८९२५५ १०८०७ या मोबाईल क्रमांकावर सम्पर्क संपर्क असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. ६,७३५ चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (लेसिक), कॉर्निया, काचबिंदू, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार, परिणाम सुनिश्चित केले जातील. या प्रसंगी बोलताना आमदार श्री. संग्राम जगताप म्हणाले, "अहिल्यानगर सारख्या वेगाने विकसित होणाऱ्या भागांमध्ये सुलभ आणि विशेषीकृत आरोग्यसेवेची गरज वाढत आहे.

# वर्ल्ड अर्थ डे निमित्त जबाबदारी आणि शाश्वततेचा संदेश

मुंबई (दै. संध्या)

वर्ल्ड अर्थ डे आपल्याला दररोज आपल्या ग्रहाची काळजी घेण्याची, जपण्याची आणि जबाबदारी स्वीकारण्याची आठवण करून देतो. संसाधनांची बचत करणे, कचरा कमी करणे किंवा आपल्या आजूबाजूच्या गोष्टींबद्दल सजग राहणे, अगदी छोट्या कृतींमुळेही मोठा बदल घडू शकतो. हा दिवस लोकांना निसर्गाशी पुन्हा जोडतो आणि पुढच्या पिढ्यांसाठी त्याचे संवर्धन करण्याची जाणीव करून देतो. यंदा सोनी सब चे कलाकार इक्बाल खान, गुलकी जोशी, मुस्कान बामने, करुणा पांडे आणि सुम्बुल तौकीर खान यांनी वर्ल्ड अर्थ डे बद्दल आपले विचार मांडले.

इक़बाल खान, 'यादें' मधील डॉ. देवची भूमिका साकारणारे, म्हणाले, "वर्ल्ड अर्थ डे आपल्याला आठवण करून देतो की आपण ज्या पृथ्वीवर राहतो ती आपली



मालकी नाही, तर आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आहे. निसर्ग आपल्याला स्थिर ठेवतो, पण आपल्या धावपळीच्या जीवनशैलीत आपण त्याची किंमत विसरतो. माझा विश्वास आहे की अगदी छोट्या सवयी जसे पाणी वाचवणे किंवा कचरा कमी करणे सातत्याने पाळल्या तर मोठा फरक पडू शकतो. व्यक्ती म्हणून आपण आपल्या कृतींची ताकद कमी लेखतो, पण जर प्रत्येकाने जबाबदारी घेतली तर त्याचा परिणाम खरोखरच परिवर्तनकारी ठरू शकतो."

गुलकी जोशी, 'यादें' मधील सृष्टीची भूमिका साकारणारी, म्हणाली, "माझ्यासाठी वर्ल्ड अर्थ डे खूप वैयक्तिक आहे, कारण मला ठाम विश्वास आहे की निसर्गाशी आपले नातेच आपण घडवणाऱ्या भविष्याची दिशा ठरवते. आपण अनेकदा मोठ्या उपाययोजना शोधतो, पण खरी गोष्ट अशी आहे की बदल घरातूनच सुरू होतो आपण कसे वापरतो, कसे टाकतो आणि अगदी कसे विचार करतो यापासून. मी शक्य तिथे पर्यावरणपूरक निवडी करण्याचा प्रयत्न करते. पृथ्वी आपल्याला इतकं काही देते, तेही काहीही परत न मागता. किमान आपण तिला प्रामाणिकपणे आणि कृतज्ञतेने जपणं हीच खरी जबाबदारी आहे."

मुस्कान बामने, 'पुष्पा इम्पॉसिबल' मधील शनायाची भूमिका साकारणारी, म्हणाली, "मला वाटतं की आपल्या पिढीकडे पृथ्वीचं भविष्य अधिक चांगलं घडवण्याची संधी आणि जबाबदारी दोन्ही आहेत. वर्ल्ड अर्थ डे म्हणजे फक्त निसर्गाचा उत्सव नाही, तर आपल्या सवयींचा विचार करून त्या पृथ्वीवर कशा परिणाम करतात हे समजून घेणंही आहे. मी माझ्या रोजच्या आयुष्यात छोटे बदल सुरू केले आहेत जसे की सिंगल-यूज प्लास्टिक टाळणं आणि कचऱ्याबाबत अधिक जागरूक राहणं. यामुळे मला जाणवलं की शाश्वत जीवनशैली जगणं खरं तर सहज शक्य आहे. आपण प्रत्येकाने एक पाऊल पुढे टाकलं, तर त्यातून खरोखरच अर्थपूर्ण बदल घडू शकतो."

करुणा पांडे, 'पुष्पा इम्पॉसिबल' मधील पुष्पाची भूमिका साकारणारी, म्हणाली, "माझा विश्वास आहे की पर्यावरणाची काळजी घेणं हे आपल्या रोजच्या जीवनात जागरूक राहण्यापासून सुरू होतं. सगळं एकाच वेळी करण्याची गरज नाही, फक्त छोटे-छोटे विचारपूर्वक पावले उचलायला हवीत. स्वतःची पिशवी घेऊन जाणं, वीज वाचवणं किंवा एखादं झाड लावणं अशा गोष्टींनी निसर्गाशी नातं तयार होतं. एकदा ते नातं जाणवलं की आपला दृष्टिकोन आपोआप बदलतो. वर्ल्ड अर्थ डे आपल्याला आठवण करून देतो की सातत्य हे परिपूर्णतेपेक्षा अधिक महत्त्वाचं आहे. प्रत्येक प्रयत्न, कितीही छोटा असो, खरोखरच महत्त्वाचा ठरतो."

## थोडक्यात पण महत्वाचे...




### धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या लेन्स कार्ड या कंपनीचा हवेली तालुका मनसे कडून निषेध

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : लेन्स कार्ड कंपनीचे सीईओ पियुष बंसल यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसाठी एक स्टेटमेंट काढले आहे त्या स्टेटमेंट मध्ये त्यांनी सांगितले आहे की टिळा,टिकली किंवा धागा घालून कर्मचाऱ्यांनी कंपनी मध्ये येऊ नये .असे आदेश कंपनीने दिले असुन या नियमांचा हवेली तालुका मनसे कडून जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे . यामुळे धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या लेन्स कार्ड या कंपनीचा हवेली तालुका मनसे कडून जाहीर निषेध करण्यात आला .पुढील काळात हिंदू धर्माची भावना व हिंदू संस्कृती धर्माविरुद्ध असे काही स्टेटमेंट जी कंपनी करेल किंवा जे व्यवस्थापन करेल त्या व्यवस्थापनाचे विरोधात सर्व सकल हिंदू समाजाच्या भावना अतिशय तीव्र असतील. पुढील काळात लक्षात घ्यावे व जाती-धर्मांमध्ये तेढ निर्माण होणार नाही म्हणून अशी वक्तव्य टाळावे .जेणेकरून पुढील काळामध्ये आपण जी वक्तव्य केली आहे . त्या वक्तव्यावर आपल्या धंद्यावर काय परिणाम होईल व हिंदू समाज किती ताकतीचा आहे हे दाखवून देण्याची वेळ पुढील काळात येऊ नये अशी मागणी लेन्स कार्ड कंपनी व व्यवस्थापकीय संचालक व सीईओ यांनी लक्षात घ्यावे व पुढील काळात चुकीचे नियम व चुकीच्या अटी घालून कर्मचाऱ्यांवर व समाजावर या गोष्टीचा काय परिणाम होईल याची काळजी कंपनीने घ्यावी व जे काही नुकसान होईल. सर्वस्वी जबाबदार हे स्वतः पियुष बंसल सीईओ लेन्स स्कार्ड हेच असतील अशी मागणी हवेली तालुक्यातून मनसेने केली यावेळी मनसे पुणे जिल्हा उपाध्यक्ष रामचंद्र काका गायकवाड, चेतन चौधरी मनसे हवेली तालुका अध्यक्ष, संदीप चोरघडे विद्यार्थी अध्यक्ष मनसे ,हवेली तालुका उपाध्यक्ष अनिरुद्ध मराठे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



### कुकडी प्रकल्प आवर्तनात 24.06टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक

नारायणगाव (दैनिक संध्या) : कुकडी प्रकल्पाअंतर्गत धरणातून शेती सिंचन व बिगर सिंचनासाठी उन्हाळी पहिल्या उन्हाळी आवर्तन पूर्ण झाले असून 7.76 टीएमसी पाण्याचा वापर झाला आहे .या प्रकल्पात सध्या 7.136 टीएमसी (24.06 टक्के ) उपयुक्त साठा शिल्लक आहे. यापैकी कुकडी डावा कालव्यासाठी 4.3 टीएमसी तर उर्वरित पिंपळगाव जोगे, मीना शाखा, डिंभे डावा व उजवा या कालव्यासाठी 3.3 टीएमसी असे एकूण 7.6 टीएमसी पाणी वापर करायचा होता .मात्र ,7 .76 टीएमसी पाण्याचा वापर झाला आहे . अशी माहिती कुकडी पाटबंधारे विभाग क्र. 1 चे कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर यांनी दिली. उन्हाळी पहिल्या आवर्तनात येडगाव धरणातून 250 किलोमीटर लांबीच्या कुकडी डावा कालव्यात 5 मार्च ते 12 एप्रिल 2026 दरम्यान (36 दिवसात) 4.70 टीएमसी पाणी सोडण्यात आले .या पाण्याचा लाभ जुन्नर, पारनेर, कर्जत, करमाळा, श्रीगोंदा या तालुक्यांना झाला . उर्वरित पिंपळगाव जोगे, मीना शाखा, डिंभे डावा व उजवा या कालव्यात 3.06 टीएमसी पाणी वापर झाला. येडगाव: 0.617 टीएमसी (31.76 टक्के ), माणिकडोह: 0.814 टीएमसी ( 8 टक्के), वडज: 0.592 टीएमसी(50.51 टक्के), पिंपळगाव जोगे:1.19 टीएमसी(30.66 टक्के), डिंभे: 3.91 टीएमसी(31.36 टक्के),चिल्हेवाडी:0.616 टीएमसी(76.75 टक्के).

### मंथन राज्यस्तरीय स्पर्धेत ज्ञानसागरचा राज्यात डंका



बारामती (दैनिक संध्या) : मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा फेब्रुवारी 2025-26 मध्ये संपन्न झाली. या परीक्षेमध्ये इयत्ता 1 ली ते 7 वी पर्यंत च्या एकून 48 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये एकूण 12 विद्यार्थ्यांनी राज्याच्या यादीमध्ये आपली बाजी मारून ज्ञानसागरच्या मानाच्या तुऱ्यात आपल यशाचे आणखी एक छाप उठवली आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी A+ ग्रेड मध्ये ओम बापूराव देवकाते (इयत्ता -6 वी ) 98.00 % राज्यात 2 रा, स्वप्नपरी रामचंद्र बंडगर (इयत्ता 4 थी ) 98.66% मिळवून राज्यात 3 रा क्रमांक, सान्वी अमोल रणसिंग (इयत्ता 1 ली )88% राज्यात 10 वी व जिल्ह्यात 5 वी, संस्कृती भारत शिंदे (इयत्ता 1 ली )81.33% राज्यात 15 वा आणि जिल्ह्यात 10 वा, ऋग्वेद कुणाल कांबळे (इयत्ता 2 री ) 85.33% राज्यात 12 आणि जिल्ह्यात 7 वी, प्रगती सतिशकुमार इंगळे (इयत्ता 2 री) 85.33% राज्यात 12 आणि जिल्ह्यात 7 वा, गार्गी कुणाल कांबळे (इयत्ता 2 री ) 86.67% राज्यात 11 वी आणि जिल्ह्यात 6 वी, मुद्रा राहुल माळवे (इयत्ता 3 री ) 92% राज्यात 12 आणि जिल्ह्यात 7 वी, अथर्व जितेंद्र शिंदे (इयत्ता 4 थी ) 91.33% राज्यात 14 वा आणि जिल्ह्यात 9 वा, अजय सतीश शिंदे (इयत्ता 6 वी )91.33% राज्यात 10 आणि जिल्ह्यात 4 था क्रमांक, अनुष्का सतीश राऊत (इयत्ता 7 वी ) 85.33% राज्यात 18 वी आणि जिल्ह्यात 4 थी,स्वरा अतुल दराडे (इयत्ता 7 वी ) 90.67% राज्यात 10 वी आणि जिल्ह्यात 3 री उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे असे गुण संपादन करून आपले यश प्राप्त केलेल्या या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.सागर मानसिंग आटोळे सरांनी मनपूर्वक अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या पुढील उज्वल भविष्यासाठी सदिच्छा दिल्या.



# नीरा कऱ्हा नदी जोड प्रकल्प पुरंदर साठी वरदान

## जेजुरीत पवित्र कऱ्हानदीवर जलकलशाचे माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते पूजन

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तींनशेव्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त गोदावरी ते नर्मदा जलयात्रेचे आयोजन करण्यात आले असून यानिमित्ताने जेजुरी येथील पवित्र कऱ्हा नदीवरून जलकलशाचे पूजन करून हा कलश शिर्डी येथील कार्यक्रमासाठी सुपूर्द करण्यात आला.

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त गोदावरी ते नर्मदा जलयात्रेचे आयोजन करण्यात आले असून मंगळवार दिनांक 21 रोजी सकाळी जेजुरी येथील कऱ्हानदीवर पुरंदरचे माजी आमदार व भाजपाचे प्रदेश सचिव संजय जगताप यांच्या हस्ते कऱ्हा नदीचे जलपूजन व जलकलश पूजन करण्यात आले.

यावेळी या जलकलशाचे कुलधर्म कुलाचार नुसार धार्मिक विधी, तळी भंडार, तसेच भंडारा ची उधळण करून हा जल कलश शिर्डी येथील जलयात्रेसाठी पाठविण्यात आला.

यावेळी बोलताना माजी आमदार संजय जगताप यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी ऐतिहासिक काळात पाण्याचे महत्त्व जाणून देशभर जलाशये निर्माण केली,भाविकांसाठी घाट बांधले,एक आदर्श राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या तीनशेव्या जन्मशताब्धी निमित्ताने शासनाच्या वतीने गोदावरी ते नर्मदा जलयात्रा आयोजित करून अहिल्यादेवींचे स्मरण केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नदीजोड प्रकल्पामुळे नीरा नदी कऱ्हा नदीला जोडली जाणार आहे. याचा फायदा पुरंदरला होणार असल्याचे ही संजय जगताप यांनी सांगितले.

कऱ्हा नदीवरील रंभाईदेवी स्थळावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी आमदार संजय जगताप,पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य हरिभाऊ लोळे, अजय इंगळे, पंचायत समितीचे सदस्य माऊली यादव, माजी सदस्य सुनीता कोलते, नीरा बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, सोमेश्वर साखर कारखान्याचे सुधाकर टेकवडे, शांताराम कापरे, माजी सरपंच संभाजी काळाने, हनुमंत काळाने, पुरंदर उपसा जलसिंचन चे कार्यकारी अभियंता अशोक शेटे, उपअभियंता दत्तात्रय कसबे, शाखा अभियंता गणेश गायकवाड, विश्वास पवार आदी उपस्थित होते.

पुरंदर उपसा जलसिंचन चे कार्यकारी अभियंता अशोक शेटे यांनी 25 एप्रिल रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्रांबकेश्वर येथून या जल यात्रेला प्रांरभ होणार असून, चौंडी, शिर्डी येथून मध्यप्रदेशातील माहेश्वरी येथे नर्मदा नदीवर ही जल यात्रा पोहचणार असल्याचे प्रास्तविक भाषणात सांगितले.

जलसंपदा विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी भाजपचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी वर्ग उपस्थित होता.



# बारामती नगरपरिषद संघाने जिंकला नगराध्यक्ष चषक

## स्व अजित पवार स्मरणार्थ जिल्हास्तरीय नगराध्यक्ष चषक



**पुणे (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्यातील आठ नगरपरिषदेतील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित नगराध्यक्ष चषक क्रिकेट स्पर्धा बारामती नगरपरिषदेने जिंकली. उपविजेतेपद जेजुरी नगरपरिषदेने पटकाविले.

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या ऐतिहासिक होळकर तलावाकाठी असणाऱ्या नवीन पालखी मैदानावर पुणे जिल्ह्यातील नगरपरिषदेच्या खेळाडूंसाठी स्व अजित पवार यांच्या स्मरणार्थ नगराध्यक्ष चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील जेजुरी, सासवड, बारामती, इंदापूर, लोणावळा, देहू, तळेगाव दाभाडे, माळेगाव नगरपरिषदेचे क्रिकेट संघ सहभागी झाले होते. तीन दिवस या स्पर्धा मैदानावर खेळविण्यात आल्या. अंतिम सामना जेजुरी व बारामती नगरपरिषदेत झाला. अतिशय अटीतटीच्या या सामन्यात बारामती या संघाने जेजुरी संघाचा पराभव करून हा सामना जिंकून प्रथम क्रमांकाचा नगराध्यक्ष चषक पटकाविला. जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे यांच्या हस्ते नगराध्यक्ष चषक देवून विजयी संघाला देवून सन्मानित करण्यात आले. प्रथम क्रमांक बारामती द्वितीय क्रमांक जेजुरी तर तृतीय क्रमांक लोणावळा नगरपरिषदेने पटकाविला. बारामती संघाने ही स्पर्धा जिंकल्या नंतर अजितदादा अमर रहेच्या घोषणा दिल्या. यावेळी जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले नगरसेवक अस्लम पानसरे, कृष्णा कुदळे, योगेश जगताप, शिवाजी जगताप, रोहित खोमणे, प्रशांत लाखे, तसेच सामाजिक कार्यकर्ते नारायण जाधव, संतोष खोमणे, वैभव कोरपड, महेश उबाळे, छबन कुदळे, बाळासाहेब सातभाई, जालिंदर खोमणे, आदी उपस्थित होते. या स्पर्धेत सामन्याचा मानकरी किताब अजय देशमुख बारामती, उत्कृष्ट फलंदाज भरत गायकवाड लोणावळा, उत्कृष्ट गोलंदाज बाळासाहेब बगाडे जेजुरी, उत्कृष्ठ क्षेत्ररक्षण मुकुंद वंजारी लोणावळा यांना देण्यात आला. या स्पर्धेचे आयोजन जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले तर या सामन्यांचे समालोचन विजय साकोरे यांनी केले.

## जर्मनीत 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष; मूर्तींची प्राणप्रतिष्ठा

**पुणे (दै. संध्या)**

आळंदी : अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर जर्मनीतील रेमबोल्डशॉसर स्ट्रासे, किर्चहेम येथील विठ्ठल धाम मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तींची रविवारी (ता. १९) विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषात हा सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला.

आळंदी व देहू संस्थानच्या वतीने आयोजित या सोहळ्यासाठी भारतातून तब्बल ३५ वारकरी सहभागी झाले होते. याशिवाय जर्मनीतील स्थानिक मराठी व जर्मन नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. आळंदी व देहू येथून गुरुवारी (ता. १६) संतांच्या मूर्ती जर्मनीकडे रवाना करण्यात आल्या होत्या. विठ्ठल धामात पोहोचल्यानंतर दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी (ता. १८) सकाळी काकड आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली, तर दुपारी दिंडी काढण्यात आली. दिवसाची सांगता "नमो ज्ञानेश्वरा" या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जीवनावर आधारित इंग्रजी कार्यक्रमाने झाली. सकाळी ७.३० वाजल्यापासून प्राणप्रतिष्ठा विधींना प्रारंभ झाला. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या नामघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सर्व विधी अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडले.

यावेळी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी इंग्रजीतून कीर्तन केले. तसेच या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण सोशल मीडियावर करण्यात आले. कार्यक्रमास देहू संस्थानचे माजी अध्यक्ष नितीन महाराज मोरे, सुनील महाराज मोरे तसेच स्वामी समर्थ प्रतिष्ठान औंधचे श्रीकांत पाटील उपस्थित होते. जर्मन भाविकांमध्ये भक्तीची रुजवात दोन दिवस चाललेल्या काकड आरती, पूजा व इतर धार्मिक विधींमध्ये जर्मन नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

# वारकऱ्यांना नीरा स्नानासाठी सुरक्षित घाट कधी मिळणार?

## भाविकांच्या सुरक्षिततेसाठी शासन पातळीवर हालचाली वेगात; लवकरच सकारात्मक निर्णयाची आशा

**नीरा (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील नीरा नदीच्या पवित्र काठावर दरवर्षी वारकऱ्यांच्या श्रद्धेचा महासागर उसळत असतो. माउलींच्या स्नानामुळे या नीरा परिसराला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. निरा नदीच्या पवित्र जलामध्ये लाखो भाविक स्नान करीत असतात. यावेळी मोठी गर्दी नदीपात्रात होत असते मात्र वारकऱ्यांची सुरक्षा मात्र वाऱ्यावर सोडली जाते. या वर्षी देखील लाखो भाविक या नदी पत्रात स्नान करणार आहेत. शासन या वारकऱ्यांच्या सुरक्षे बाबत दुर्लक्ष करताना दिसत आहे. त्यामुळे नीरा पत्रात सुरक्षित आणि सुसज्ज घाट उभारण्याची मागणी आता तीव्र झाली आहे.



नीरा आणि पाडेगाव येथे दरवर्षी हजारो पुरुष व महिला भाविक मोठ्या भक्तिभावाने स्नान करतात. मात्र, सुरक्षित घाट नसल्याने पाण्यात उतरताना होणाऱ्या अडचणी, गर्दीमुळे निर्माण होणारे धोके आणि आवश्यक सोयींचा अभाव यामुळे भाविकांना त्रास सहन करावा लागतो. अनेक वेळा या परिस्थितीमुळे अपघाताचा धोका वाढतो, तसेच वारकऱ्यांच्या भावना दुखावल्या जात आहेत.

भाविकांच्या सुरक्षिततेचा विचार करता, नीरा नदीवर सुस्थितीत घाट उभारणे ही केवळ गरज नसून अत्यावश्यक बाब बनली आहे. याच पार्श्वभूमीवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रयत्न सुरू असून, याला सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याची माहिती पुढे येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या कामासाठी हालचाली सुरू आहेत. तसेच, भाजपचे प्रदेश विस्तारक योगेंद्र माने यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा विषय शासन दरबारी प्राधान्याने घेतला जात आहे.

सध्या शासन स्तरावर या प्रस्तावावर सकारात्मक कार्यवाही सुरू असून, लवकरच नीरा व पाडेगाव येथे सुरक्षित आणि सुसज्ज घाट मंजूर होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

ही मागणी केवळ विकासकामापुरती मर्यादित नसून, लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धा, भावना आणि परंपरेचा सन्मान करण्याशी निगडित आहे. त्यामुळे भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वारकरी परंपरेच्या जतनासाठी हा घाट लवकरात लवकर साकार व्हावा, अशी मागणी वाराकऱ्यांकडून होत आहे तर स्थानिक लोकांकडून देखील याबाबत मागणी जोर धरत आहे.